**हा लेख लिहितांना मा. श्री. ए.के.गुप्ते आणि मा. श्री. एस.डी. दिघे या दोन्ही विद्वान वकील महोदयांनी, सन १९९२ मध्ये लिहिलेल्या THE MAMLATDARS' COURTS ACT या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचाही संदर्भ घेतला आहे.**

सन १८७६ पासून अस्तित्वात असणारा मामलतदार न्यायालय अधिनियम हा अत्यंत जुना, प्रभावी तरीही दुर्लक्षित कायदा आहे. या कायद्याचे अधिकार खरंतर दिवाणी न्यायालयाला देता आले असते. परंतु सर्व सामान्य शेतकऱ्याला दिवाणी न्यायलयातील किचकट व वेळखाऊ प्रक्रिया पार पाडणे बरेच अवघड गेले असते. आणि मामलतदार *(१९६८ पासून तहसिलदार)* हा तालुक्याचा प्रमुख, स्थानिक महसूल अधिकारी, तळागाळापर्यंत पोहोचणारा अधिकारी आणि अर्ध न्यायीक अधिकार धारण करणारा अधिकारी असल्यामुळे कायदाकारांना या कायद्याचा प्रभावी वापर करण्यासाठी मामलेदारच योग्य वाटला.

मामलतदार न्यायालय अधिनियम हा विशेष कायदा (Special Act) असल्यामुळे तो सामान्य कायद्यांपेक्षा (General Act) प्रभावी आहे.

# मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६

## ☞ कलम १: अधिनियमाची व्याप्ती

**(१)** या अधिनियमाला मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ असे म्हणण्यात यावे.

**(२)** हा कायदा मुंबई वगळता सर्व महाराष्ट्र राज्यासाठी लागू असेल.

## ☞ कलम २: मामलतदार न्यायालय अधिनियम, १८७६ रद्द

मामलतदार न्यायालय अधिनियम, १८७६ हा याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

## ☞ कलम ३: अर्थविवरण

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधिनियमात,

**(एए)** जिल्हाधिकारी (Collector) यात जिल्ह्याच्या सर्वसाधारण प्रशासनावर देखरेख करणारा प्रमुख असलेल्या उपायुक्ताचा (Deputy Commissioner) समावेश होतो.

**(ए)** मामलतदार यात, त्या वेळेस मामलतदाराचे अधिकार वापरणारा कोणताही महसूल अधिकारी किंवा शासनाने या अधिनियमान्वये मामलतदाराचे अधिकार प्रदान केलेली कोणतीही व्यक्ती यांचा समावेश होतो.

➲ *(मामलतदार हा अरबी भाषेतला शब्द असुन 'मुआमला' म्हणजे व्यवहार किंवा गंभीर, कठीण आणि गुंतागुंतीचे प्रकरण.)*

**(बी)** वादी (Plaintiff) आणि प्रतिवादी (Defendant) यांत –

(१) वादी किंवा प्रतिवादी यांनी नियुक्त केलेला अभिवक्ता (Pleader) आणि

(२) दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ३७ अन्वये परिभाषित केलेला, वादी किंवा प्रतिवादी यांच्यामार्फत नियुक्त केलेला कायदेशीर प्रतिनिधी यांचा समावेश होतो.

Dr. SANJAY KUNDEKAR, Dy. Collector

☞ **कलम ४:** **राज्य शासनाचा संयुक्त मामलेदार नेमण्याचा अधिकार**

**(१)** राज्य शासन, शासकीय राजपत्रकातील अधिसूचनेद्वारे कोणताही तालुक्यात संयुक्त मामलतदारची (Joint Mamlatdar) नेमणूक करू शकेल, ज्याच्याकडे मामलतदारचे सर्व अधिकार सोपविण्यात येतील. या शिवाय तो मामलतदारमार्फत त्याच्याकडे सोपविलेल्या प्रकरणांवर निर्णय करेल.

**(२)** मामलतदार, या अधिनियमाच्या कलम ७ अन्वये त्याच्याकडे दाखल झालेले दावे, अप्पर मामलतदारकडे सोपवू शकेल आणि संयुक्त मामलतदारने, मृत्यू किंवा आजारपण किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे निकाली न काढलेले असे सोपविलेले दावे परत स्वत:कडे घेऊ शकेल.

**(३)** राज्यशासन, उपकलम (१) अन्वयेचे अधिकार, जिल्हाधिकारी पदापेक्षा कमी असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला प्रदान करू शकेल.

➲ *मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६, कलम ७ अन्वये दाखल करण्यात येणारा दावा फक्त मामलेदार/तहसिलदार यांच्याच समोर दाखल करता येतो. असा दावा सह/ संयुक्त अप्पर मामलेदार/तहसिलदार, नायब मामलेदार/तहसिलदार यांच्या समोर कलम ७ अन्वये दाखल करण्यात येणारा दावा दाखल करता येणार नाही. तथापि, मामलेदार/तहसिलदार समोर दाखल झालेला दावा, जर मामलेदार/तहसिलदारने, सह मामलेदार/तहसिलदार, नायब मामलेदार/तहसिलदार यांच्याकडे वर्ग केला तर असा दावा सह मामलेदार/तहसिलदार, नायब मामलेदार/तहसिलदार यांना चालविता येईल. परंतु संयुक्त मामलेदार/तहसिलदार, नायब मामलेदार/तहसिलदार यांनी दिलेल्या निकालवर तहसिलदारकडे अपील करता येणार नाही कारण मामलेदार/तहसिलदार हे अपील न्यायालय नाही.*
*मामलेदार/तहसिलदारने वरीलप्रकारे वर्ग केलेला दावा, पुन्हा मामलेदार/तहसिलदारला स्वत:कडे घेता येऊ शकतो.*

☞ **कलम ५:** **मामलतदार न्यायालयाचा अधिकार**

**(१)** प्रत्येक मामलतदार हा अशा न्यायालयाचा अध्यक्ष असेल ज्याला मामलतदारांचे न्यायालय म्हणता येईल. आणि त्याला त्याच्या अधिकार क्षेत्रासाठी या अधिनियमाच्या कलम ६ आणि २६ चे आणि राज्यशासन वेळोवेळी प्रदान करेल असे अधिकार असतील जसे -

**(अ)** शेती किंवा चराईसाठी वापरात असलेल्या, पिके किंवा झाडे असलेल्या कोणत्याही जमिनीतून किंवा तीस संलग्न असलेल्या जमिनीत/जमिनीतून किंवा वाहत्या कालव्याच्या प्रवाहात किंवा ज्यातून पाणी स्वाभाविकपणे वाहत असेल अशा कोणत्याही पृष्ठभागावर, अवैधरित्या कोणीही अडथळा निर्माण केला असेल व अशा अडथळयामुळे शेती किंवा चराईसाठी वापरात असलेल्या/पिके किंवा झाडे असलेल्या जमिनीस किंवा वाहत्या कालव्याच्या प्रवाहाला किंवा ज्यातून पाणी स्वाभाविकपणे वाहत असेल अशा कोणत्याही पृष्ठभागाला धोका पोहोचण्याचा संभव असेल तर असा अवैध अडथळा काढून टाकण्याचे अधिकार.

➲ *या कलमान्वये कारवाई करतांना रस्ता पूर्वापार वहिवाटीचा व वापरामध्ये असावा तसेच त्या रस्त्यात अडथळा निर्माण केला गेला असावा. नवीन रस्ता देणे या कायद्यात अपेक्षीत नाही.*

**(ब)** ज्या व्यक्तींना कायदेशीर मार्गाखेरीज अन्य तऱ्हेने त्यांच्या शेती, कुरणे, झाडे, पिके, मासेमारीची जागा, घर, विहीर, तलाव, पाट, पाण्याचा प्रवाह यांचा कब्जा काढून घेतला असेल किंवा त्यांचे याबाबतचे कायदेशीर हक्क हिरावून घेतले असतील किंवा उपरोक्त प्रमाणे अवैध अडथळा केला असेल तर वैध मालकास असा कब्जा देता येईल. परंतु असे की, या अधिनियमाखाली दाखल केलेल्या एखाद्या प्रकरणाबाबत मामलतदारचे असे मत झाले की, एखाद्या प्रकरणात कोणताही अडथळा दूर करणे किंवा ताबा देणे यासाठी कायद्याचा सखोल अभ्यास करून निर्णय देणे क्रमप्राप्त आहे किंवा एखाद्या प्रकरणात दिवाणी न्यायलय उचित निर्णय घेण्यास सक्षम आहे किंवा एखादे प्रकरण



Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

या अधिनियमान्वये न चालवता अन्य कायद्यान्वये किंवा अन्य न्यायासनाकडे चालविणे उचित राहील, तर मामलतदार अशा प्रकारचे प्रकरण लेखी कारणे नमूद करून फेटाळू शकेल.

➲ *या कलमाखाली कुळ किंवा कुळाचे हक्क ठरविता येणार नाही. त्यासाठी कुळ कायद्याच्यातरतुदींप्रमाणे अर्ज करावा लागेल. या अधिनियमाच्या तरतुदीन्वये कुळाचे प्रकरण दाखल झाल्यास, लेखी कारणे नमूद करून मामलेदारला असा अर्ज फेटाळता येईल.*

<u>(२)</u> याशिवाय, उपरोक्त तरतुदीन्वये, न्यायालयाला उपकलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शेती किंवा चराईसाठी वापरात असलेल्या, पिके किंवा झाडे असलेल्या कोणत्याही जमिनीतून किंवा तीस संलग्न असलेल्या जमिनीत/जमिनीतून किंवा वाहत्या कालव्याच्या प्रवाहात किंवा ज्यातून पाणी स्वाभाविकपणे वाहत असेल अशा कोणत्याही पृष्ठभागावर, अवैधरित्या कोणीही अडथळा निर्माण केला असेल किंवा अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असेल व अशा अडथळयामुळे शेती किंवा चराईसाठी वापरात असलेल्या/पिके किंवा झाडे असलेल्या जमिनीस किंवा वाहत्या कालव्याच्या प्रवाहाला किंवा ज्यातून पाणी स्वाभाविकपणे वाहत असेल अशा कोणत्याही पृष्ठभागाला धोका पोहोचण्याचा संभव असेल तर असा अवैध अडथळा निर्माण करण्यापासून मनाई आदेश काढून रोखण्याचा अधिकार असेल.

<u>(३)</u> वरील प्रमाणे कारण घडल्यापासून सहा महिन्याच्या आत त्याविरूध्द दावा दाखल करण्यात आला नाही तर अशा मुदतीनंतर दाखल झालेला दावा या अधिनियमाखाली स्वीकारता येणार नाही.

<u>(४)</u> वरीलप्रमाणे ज्या दिनांकास असा अडथळा, निष्कासन, हानी सुरू करण्यात आली असेल त्या दिनांकापासून ही मुदत सुरू झाल्याचे मानण्यात येईल.

**<u>उदाहरण-१</u>**

अ ने स्वत:चे शेत ब ला, एक किंवा जास्त वर्षासाठी वहिवाटीसाठी दिले. मुदत संपल्यानंतर सदर शेताचा कब्जा पुन्हा अ कडे देण्यास ब ने नकार दिला. अ ला कब्जा मिळविण्यासाठी मामलतदार न्यायालयात सहा महिन्याच्या आत दावा दाखल करता येईल. परंतु लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, ब त्या जमिनीचा पूर्वीचा मालक, किंवा अंशत: मालक असलेला इसम किंवा अशा पूर्वीच्या मालकाचा अथवा अंशत: मालकाचा वैध प्रतिनिधी नसावा.

**<u>उदाहरण-२</u>**

ब हा अ चा वार्षिक कुळ आहे. अ ने ब ला त्यावेळेस अस्तित्वात असलेल्या कायद्यान्वये कुळाची वहिवाट समाप्त करण्यासाठी आवश्यक असलेली कायदेशीर नोटीस वर्षाची मुदत संपण्यापूर्वी दिली. पुढील वर्ष सुरू झाल्यानंतर ब ने सदर शेताचा कब्जा पुन्हा अ कडे देण्यास नकार दिला.

अ ला पुढील वर्ष सुरू झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत मामलतदार न्यायालयाकडे दाद मागता येईल. परंतु लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, ब त्या जमिनीचा पूर्वीचा मालक, किंवा अंशत: मालक असलेला इसम किंवा अशा पूर्वीच्या मालकाचा अथवा अंशत: मालकाचा वैध प्रतिनिधी नसावा.

**<u>उदाहरण-३</u>**

अ ने स्वत:च्या शेत जमिनीतील विहिरीतून पाणी उचलण्याचा अधिकार विशिष्ठ कालावधीसाठी ब ला दिला. सदर कालावधी संपल्यानंतरही जर ब ने, अ च्या विहिरीतून पाणी उचलणे चालूच ठेवले तर असा कालावधी संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत अ ला मामलतदार न्यायालयात दाद मागता येईल. परंतु लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, ब त्या जमिनीचा पूर्वीचा मालक, किंवा अंशत: मालक असलेला इसम किंवा अशा पूर्वीच्या मालकाचा अथवा अंशत: मालकाचा वैध प्रतिनिधी नसावा.



Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**उदाहरण-४**

अ आणि ब एका पाण्याच्या पाटाजवळील किंवा पाण्याच्या कृत्रीम स्त्रोताजवळील जमीन धारण करतात ज्या स्त्रोच्या पाण्याचा वापर फक्त ब करीत होता. अ अशा स्त्रोतातून पाणी घेतो. तर ब, अ ने असे पाणी घेतल्याच्या सहा महिन्याच्या आत अ ला सदर पाणी घेण्यास मनाई करावी म्हणून त्याच्या विरूध्द मामलतदार न्यायालयात दाद मागू शकेल.

➲ *मामलतदार न्यायालय हे शेतकऱ्यांसाठी प्राथमीक न्यायालय आहे जे शेतीसाठी वापरण्यात येणारी जमीन, परिसर इत्यादींसंबंधीचे वाद तात्पुरत्या स्वरूपात मिटवू शकते आणि (१) जमीनीचा ताबा देणे इत्यादी (२) पाण्याचा वापर इत्यादी किंवा अडथळा करण्यास मनाई आदेश देऊ शकते.*

➲ या अधिनियमाचा उद्देश तत्काळ न्याय प्रदान करणे हा आहे. त्यामुळे ज्याप्रकरणांत कायद्याचा सखोल अभ्यास करून निर्णय देणे क्रमप्राप्त आहे. किंवा अन्य न्यायासनाकडे किंवा अन्य कायद्यान्वये चालविणे उचित राहील अशी प्रकरणे मामलतदारला लेखी कारणे नमूद करून फेटाळता येतील.

➲ ज्या प्रकरणात शासकीय अधिकाऱ्यांचा अधिकृत सहभाग असेल अशी प्रकरणे मामलतदार न्यायालयाला हाताळता येणार नाहीत.

➲ प्रतिवादी, दावा दाखल होण्याच्या लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, दावा जमिनीचा पूर्वीचा मालक, किंवा अंशत: मालक असलेला इसम किंवा अशा पूर्वीच्या मालकाचा अथवा अंशत: मालकाचा वैध प्रतिनिधी यांच्या विरूध्दची प्रकरणे मामलतदार न्यायालयाला हाताळता येणार नाहीत.

➲ मामलतदार न्यायालयाला (१) तात्काळ ताबा देणे (२) पाणी वापराचा अधिकार पुन्हा मिळवून देणे इत्यादी
(३) कोणत्याही जमिनीतून किंवा तीस संलग्न असलेल्या जमिनीत/जमिनीतून किंवा वाहत्या कालव्याच्या प्रवाहात किंवा ज्यातून पाणी स्वाभाविकपणे वाहत असेल अशा कोणत्याही पृष्ठभागावर, अवैधरित्या निर्माण केलेला अडथळा दूर करणे
(४) अडथळयास हुकूमाद्वारे मनाई करणे अशी कामे करता येतील.

➲ मामलतदार न्यायालयाला (१) शेतीसाठी किंवा गुरे चरण्यासाठी वापरात असलेल्या जमिनीचा (२) शेतीखाली असलेल्या परिसराचा (३) झाडांचा (४) मासेमारी बाबत (५) पिकांचा तात्काळ ताबा देता येईल.

➲ मामलतदार न्यायालयाने पुढील बाबींची खात्री करावी: ♦ जमिनीचा ताबा परत मिळवून देतांना: (१) ताबा अवैधरित्या काढून घेतलेला असावा (२) प्रतिवादी, दावा दाखल होण्याच्या लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, दावा जमिनीचा पूर्वीचा मालक इत्यादी नसावा. ♦ पाण्याचा ताबा परत मिळवून देतांना: (१) या अधिनियमान्वये फक्त शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा ताबा परत मिळवून देता येईल (२) पाण्याचा स्त्रोत नैसर्गिक किंवा कृत्रीम असू शक(३) तो  प्रतिवादी, दावा दाखल होण्याच्या लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, दावा जमिनीचा पूर्वीचा मालक इत्यादी नसावा.

➲ मामलतदार न्यायालयास कोणत्याही जमिनीतून किंवा तीस संलग्न असलेल्या जमिनीत/जमिनीतून नैसर्गिक किंवा कृत्रीमरित्या वाहत्या पाण्याच्या प्रवाहात अवैधरित्या निर्माण केलेला अडथळा जर पिके किंवा झाडांना हानीकारक असेल तर तो दूर करता येईल.

➲ कोणतीही व्यक्ती  (१) जमिनीच्या वैध ताब्यास (२) नैसर्गिक किंवा कृत्रीम स्त्रोतातून पाण्याच्या वापरास
(३) शेतजमिनीपर्यंत किंवा पाण्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यात किंवा वहिवाटीच्या रस्त्यात अडथळा निर्माण केला असेल किंवा करीत असेल तर मामलतदार न्यायालयास मनाई हुकूम देता येईल.

➲ शेतजमिनीवर 'प्रत्यक्ष ताबा' असणे म्हणजे जर एखाद्या शेत जमिनीची वहिवाट-
**(१)** जमिनीचा मालक किंवा त्याचे कुटुंबीय करीत असतील किंवा कुळ कायद्यानुसार असलेले वैध कुळ करीत असेल किंवा
**(२)** उपरोक्त व्यक्तींशिवाय अशी इतर व्यक्ती करीत असेल, जी कायदेशीर कागदोपत्री पुराव्याद्वारे स्वत:च्या वहिवाटीचे/ताब्याचे समर्थन करू शकेल. जमिनीचा ताबा असणे म्हणजे जमिनीवर हक्क असणे असे ठामपणे सांगता येत नाही. ताबा हा जाणिवपूर्वक चुकीचा आणि अवैध असू शकतो.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

➲ या अधिनियमान्वये जमीन, झाडे इत्यादीतून झालेल्या फायद्याचा (advantages, benefits, profits) ताबा देता येणार नाही.

➲ मुंबई वगळता अन्य शहरातील ज्या जमिनी शेतीच्या कारणासाठी वापरात आहेत त्यांवरही मामलतदार न्यायालय अधिनियमाचा अंमल असेल.

➲ शेती (agriculture) या व्याख्येचा अर्थ मालमत्ता हस्तांतरण कायदा, कलम ११७ नुसार जो आहे तसा घेण्यात यावा.

➲ शेतीसाठी वापरण्यात येणारा परिसर (premises used for agriculture) म्हणजे ज्या बांधकामाचा वापर (१) शेतीची साधने ठेवण्यासाठी आणि/किंवा (२) शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या जनावरांचा गोठा आणि/किंवा (३) धान्य साठविण्यासाठी (४) वहिवाटदाराने किंवा कुळाने किंवा जमीन मालकाने शेतीवर, शेतीसाठीच्या पाण्यावर किंवा कोणत्याही शेतीसंलग्न कामांवर लक्ष किंवा पर्यवेक्षण (supervising ) करण्यासाठी बांधलेली इमारत, घर, पक्के बांधकाम (५) शेतजमिनीत प्रत्यक्ष राबणाऱ्या मजुर, कुळ किंवा अन्य व्यक्तींच्या निवासासाठी करण्यात येतो.

➲ घराभोवती फुलांची, फळाची, नारळाची फक्त काही झाडे असणे म्हणजे 'शेती करणे' असा अर्थ घेता येणार नाही. 'शेती करणे' यात जमिनीची नांगरणी (ploughing) करणे, जमिनीत पेरणी (sowing) करणे, जमिनीची मशागत (tiling) करणे आणि जमिनीत उत्पन्न झालेल्या उत्पादनाची कापणी (reaping) करणे यांचा समावेश होतो. *[भाऊ महादू वि. विठ्ठल दत्तात्रय- ४४, बॉम्बे, ६०९ (१९१९)]*

➲ नैसर्गिकरित्या उगवणारे गवत असणारी जमीन धारण करणे म्हणजे 'शेती करणे' असा अर्थ घेता येणार नाही. असे गवत जनावरांना चरण्यासाठी उगवू दिले आणि ते चरण्यासाठी जनावरांना मुक्तपणे वावर दिला तरच 'शेती करणे' असा अर्थ घेता येईल. *[विश्राम काला वि. पी. एम. शाह- जी.एल.आर. २३(१९६०)]* किंवा अशा गवताचा व्यवसायासाठी, विकण्यासाठी वापर केला तरच 'शेती करणे' असा अर्थ घेता येईल. *[बी.आर.टी. ५८३(१९५१-५२-२१.४.१९५१) अर्जदार जे.एच. ऊबाळे, पुणे (पान.११३)]*

➲ **सुविधाधिकार** (easement): सुविधाधिकार म्हणजे कोणत्याही जमिनीचा मालक किंवा वहिवाटदार यांनी त्या जमिनीशी संलग्न असलेल्या फायदा/सुविधा यांचा उपभोग घेणे. सुविधाधिकाराची व्याख्या मुदतीचा कायदा १९०८ (Limitation Act,1908), कलम २(५) अन्वये करण्यात आली आहे. सुविधाधिकारात मासेमारीच्या हक्काचाही समावेश होतो. सुविधाधिकार, जुनी वहिवाट (prescription), करार (covenant), मान्यता (grant), नियम (statute), कल्पना किंवा ईच्छा (device), रूढी (custom) यांमुळे निर्माण होतो. (Indian Easements Act, कलम २०) पाण्यावरील सुविधाधिकार ही अमूर्त (intangible) बाब आहे आणि याचे हस्तांतरण फक्त नोंदणीकृत दस्तानेच होऊ शकते. सुविधाधिकार पुढील कारणांमुळे संपुष्टात येतो:
(१) अशा सुविधाधिकारांचा उपभोग, त्या ज्याच्या आधीन आहेत त्याचे हक्क संपुष्टात आल्यास (२) असे हक्क सोडून दिल्यास (३) असे अधिकार रद्द केले गेल्यास (४) असे अधिकार काही ठराविक कालावधीसाठी दिले असल्यास त्या कालावधीनंतर संपुष्टात येतात (५) संबंधित सुविधाधिकारांची आवश्यकता संपल्यानंतर (६) असे सुविधाधिकार निरुपयोगी ठरल्यास (७) अशा सुविधाधिकारांमध्ये कायमचे बदल करण्यात आल्यास (८) ते कायमचे नष्ट केले गेले असल्यास (९) त्यांच्या मालकीचे एकत्रीकरण झाल्यास (१०) त्यांचा उपभोग घेतला गेला नसल्यास.

गावातील रूढीनूसार, गावातील प्रत्येक व्यक्तीस गुरचराईसाठी ठेवलेल्या सामाईक कुरणात (pasture) गुरे चरण्यासाठी घेऊन जाण्याचा सुविधाधिकार (Right of easement ) असेल. (Indian Easements Act, कलम १८(अ))

➲ सामाईक चराऊ कुरणात (common pasturage) गुरांना, फक्त तोंडाने चरण्याचा (bite of cattle) अधिकार असतो. परंतु तेथील गवत कापून नेण्याचा अधिकार असणार नाही. चराऊ कुरणावर संपूर्ण गावाचा सामाईक

Dr SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

अधिकार असतो. मामलतदार न्यायालय अधिनियमान्वये मामलतदारला सुविधाधिकार ठरविता येणार नाहीत परंतु सुविधाधिकारांच्या वहिवाटीतील अडथळे दूर करता येतील.

➲ **मनाई आदेश** (injunction order): म्हणजे कायद्याची अशी प्रक्रिया, ज्याद्वारे पक्षकाराला एखादी गोष्ट करण्यापासून प्रतिबंध करता येतो किंवा एखादी गोष्ट करण्यास भाग पाडता येते. सर्वसाधारणपणे मनाई आदेशाचे खालील प्रकार आहेत.

(१) अंतरिम किंवा तात्पुरता मनाई आदेश (Interim injunction): हा मनाई आदेश ठराविक काळासाठी, किंवा दावा सुरू असतांच्या मधल्याकाळासाठी, तात्पुरत्या स्वरूपात देता येतो.

(२) अनिवार्य मनाई आदेश (mandatory injunction): या मनाई आदेशाचे पालन करणे सक्तीचे असते.

(३) कायमस्वरूपी मनाई आदेश (perpetual injunction): सर्वसाधारणपणे हा मनाई आदेश दाव्याच्या अंतिम सुनावणीनंतर देतात. असा आदेश कायस्वरूपी अस्तित्वात असतो.

(४) प्रतिबंधात्मक मनाई आदेश (prohibitory injunction): एखादी गोष्ट करण्यापासून रोखण्यासाठी असा मनाई आदेश देण्यात येतो.

➲ **मनाई आदेशाचा उद्देश:** एखाद्या गोष्टीचे भविष्यात होणारे नुकसान रोखणे हा मनाई आदेशाचा उद्देश असतो.

➲ **मनाई आदेशाची उपयुक्तता:** एखाद्या गोष्टीचे झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याची तरतुद जरी कायद्यात असली तरी, भविष्यात होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी मनाई आदेश उपयुक्त ठरतो. तसेच प्रत्येक गोष्टीच्या नुकसान भरपाईची किंमत पैशाने ठरविता येईलच असे नाही, आणि जर नुकसान भरपाईची किंमत ठरविली गेली तरी ती पुरेशी असेलच असे नाही. त्यामुळे नुकसान भरपाईची तरतुद उपयुक्त आहे.

➲ **मनाई आदेश देतांनाची दक्षता:** मनाई आदेश हा अत्यंत सावधगिरीने दिला गेला पाहिजे. नुकसान होण्याची शक्यता, नुकसानाचे प्रमाण, त्याचे परिणाम लक्षात घेऊनच मनाई आदेश दिला गेला पाहिजे. एकतर्फी मनाई आदेश देणे टाळले पाहिजे, तातडीच्या वेळेस, विरोधी पक्षकाराच्या अनुपस्थितीत एकतर्फी मनाई आदेश देणे अनिवार्य असल्यास, अशा एकतर्फी मनाई आदेशाची प्रत अनुपस्थितीत पक्षकाराला प्राप्त होण्यास जो कालावधी आवश्यक असेल तितक्याच कालावधीसाठी एकतर्फी मनाई आदेश देण्यात यावा. नंतर दोन्ही पक्षकारांच्या उपस्थितीत त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. मनाई आदेश शक्यतो तात्पुरता असावा. प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन त्यात योग्य तो बदल करावा.

मामलतदार न्यायालय अधिनियम फक्त शेतीसाठी लागू आहे त्यामुळे शेतीकडे, शेतीसाठी असणाऱ्या पाण्याकडे जाणारे रस्ते, परंपरागत वहिवाटीचे रस्ते, सामाईक गुरचरण कुरणाकडे जाणारे रस्ते त्यादींमध्ये अवैध अडथळा किंवा प्रतिबंध केला असल्यास मामलतदाराला मनाई आदेश देता येईल.

मनाई आदेश हा व्यक्ती विरूध्द देता येतो, जमिनीविरूध्द नाही हे लक्षात घ्यावे. मामलतदार न्यायालय अधिनियमान्वये मामलतदारला अंतरिम किंवा तात्पुरता मनाई आदेश (Interim injunction) देण्याचा अधिकार नाही. *[जामदार सुलेमान बच्जुमिया वि. महाविर मथरदीन- IV गुजरात, एल.आर १३१ (१९६३)]*

वैध उपभोग घेण्यापासून वंचित केले असता मामलतदारला मनाई आदेश देण्याचा अधिकार आहे.

➲ मामलतदार न्यायालय अधिनियमान्वये दिलेला मनाई आदेश फक्त संबंधित प्रकरणातील प्रत्यक्ष पक्षकारांनाच बंधनकारक असेल. उदा. जमीन मालकाच्या कुलमुख्यातरला दिलेला मनाई आदेश जमीन मालकाला बंधनकारक असणार नाही. कारण प्रत्यक्ष अडथळा करणाऱ्याच्या विरोधातच मामलतदार न्यायालय अधिनियमान्वये दावा दाखल केला जातो. कुळाच्या वतीने जमीन मालकाने दाखल केलेला दावा या अधिनियमान्वये चालवता येणार नाही.

एखाद्या व्यक्तीने उपरोक्त वैध मार्गात अडथळा करण्याचा प्रयत्न (attempt) केला तरी त्याला अधिनियमान्वये तसे न करण्याबाबत मनाई करता येईल मग कृती (act) पूर्ण झालेली नसली तरी चालेल.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

➲ कृती (act) म्हणजे काय? कोणतीही कृती घडण्यास तीन गोष्टी कारणीभूत ठरतात. (१) उद्देश/हेतू (intention), (२) तयारी (preparation), (३) प्रयत्न (attempt). त्यामुळे अशा अवैध कामासाठी केलेले प्रयत्न (attempt) भविष्यात घडणाऱ्या कृतींच्या धोक्यांची सूचना (alarm) देतात.

**☛ कलम ६: दावे वर्ग करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा अधिकार**

जिल्हाधिकाऱ्यांना, उभय पक्षकारांना योग्य ती नोटीस दिल्यानंतर, लेखी आदेशान्वये, त्याच्या जिल्ह्यातील कोणत्याही मामलतदाराच्या न्यायालयातून, कोणताही दावा, त्याच्या जिल्ह्यातील दुसऱ्या कोणत्याही मामलतदारकडे पाठविण्याचा अधिकार असेल. आणि ज्या मामलतदारकडे तो दावा पाठविला असेल त्याने त्यानंतर अशा दाव्यात क्षेत्राधिकार वापरला पाहिजे.

परंतु, या अधिनियमातील कलम २१ अन्वये, ग्राम अधिकाऱ्याला देण्यात येणारा कोणताही आदेश, सदर ग्राम अधिकारी ज्या मामलतदाराच्या अधिपत्त्याखाली कार्यरत असेल अशा मामलतदारामार्फत पाठविण्यात येईल.

अशा प्रकारे एका मामलतदाराकडून दुसऱ्या मामलतदाराकडे दावा वर्ग करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, कलम ४०७ मध्ये नमूद कारणांचा विचार करण्यात येईल.

जेव्हा जिल्हाधिकाऱ्यांच्या असे निदर्शनास आणून दिले जाईल की,

(१) सदर मामलतदार न्यायालयात न्याय्य व नि:पक्षपाती चौकशी होऊ शकत नाही.

(२) असाधारण अडचणीचा एखादा प्रश्न उद्भवण्याची शक्यता आहे.

(३) दाव्यातील जागेचा विचार करता समाधानकारक चौकशीसाठी असे करणे आवश्यक आहे.

(४) उभय पक्षकारांच्या सोयीच्यादृष्टीने असे करणे योग्य ठरेल.

(५) दावा लवकर निकाली काढण्याच्यादृष्टीने असे करणे योग्य ठरेल.

संबंधित मामलतदारच्या न्यायबुध्दीवर पक्षकारांचा विश्वास नसेल तरीही वैध कारणांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे असा अर्ज करता येईल.

संबंधित मामलतदारचे सदर प्रकरणात किंवा दावा जमिनीत स्वारस्य असेल तरीही वैध कारणांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे असा अर्ज करता येईल.

➲ अशा प्रकारे एका मामलतदाराकडून दुसऱ्या मामलतदाराकडे दावा वर्ग करतांना, जिल्हाधिकाऱ्यांनी समाधानकारक कारणांचा विचार करावा. संबंधीत मामलेदारची प्रतिमा मलीन होईल असा विचार करण्याचे कारण नाही.

संबंधित मामलतदार कितीही सक्षम आणि न्याय्य व नि:पक्षपाती असला तरीही, पक्षकारांच्या मनात त्याबाबत किंचितही संशय असेल तर असे प्रकरण वर्ग करण्यास हरकत नाही.

➲ वरीलप्रकारे एका मामलतदाराकडून दुसऱ्या मामलतदाराकडे दावा वर्ग करण्याआधी, दाव्यातील सर्व हितसंबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय असे हस्तांतरण करता येणार नाही.

ज्या मामलतदारकडे असा दावा पाठविण्यात येईल त्याने सदर दाव्याचा अंतिम निकाल झाल्यानंतर, दाव्याची सर्व कागदपत्रे, आदेशासह संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविली पाहिजेत. त्यानंतर जिल्हाधिकारी, ज्या मामलतदारच्या अधिकार क्षेत्रात दावा जमीन असेल त्या मामलतदारकडे, योग्य ते निर्देश देऊन ती कागदपत्रे पाठविण्याची व्यवस्था करतील.

वरीलप्रकारचे हस्तांतरण एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात करावयाचे असेल तर त्यासाठी उच्च न्यायालयाची परवानगी आवश्यक असेल.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

☛ **कलम ७:** **दावापत्रातील मजकूर**

या अधिनियमान्वये दाखल करण्यात येणारे अर्ज दावा (plaint) म्हणून, दाव्याच्या स्वरूपात दाखल करण्यात येतील. दावा म्हणजे कृती/घटना घडल्याच्या कारणाचे (cause of action) लिखित स्वरूपात असलेले निवेदन.

प्रत्येक दाव्यात खालील मजकूर असणे आवश्यक असेल.:

**(अ)** वादीचे संपूर्ण नाव, वय, धर्म, जात, व्यवसाय व रहिवासाचा पत्ता.

**(ब)** प्रतिवादीचे संपूर्ण नाव, वय, धर्म, जात, व्यवसाय व रहिवासाचा पत्ता.

**(क)** उभारलेल्या अडथळयाचे स्वरूप, ठिकाण व जी निषेध आज्ञा/कब्जा हवा त्याचे स्वरूप.

**(ड)** दाव्याचे कारण उद्भवल्याची तारीख.

**(इ)** दाव्याचे कारण उद्भवण्यास कारणीभूत परिस्थिती.

**(फ)** दाव्यास उपयुक्त कागदपत्रे, पुरावे, साक्षीदारांची संपूर्ण माहिती.

*(माहिती अपूर्ण आहे या सबबीखाली मामलतदारला दावा फेटाळता येणार नाही.)*

➲ 'वादी' (plaintiff) म्हणजे जी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या विरोधात, *[ज्याला प्रतिवादी किंवा जाब देणार (defendant) असे म्हणण्यात येते]* कायदेशीर कारवाईला सुरूवात करतो. एकापेक्षा जास्त वादी असू शकतात. या अधिनियमान्वये वादी म्हणजे जी व्यक्ती सर्वसाधारणपणे खालील गोष्टी खऱ्या आहेत असे प्रतिज्ञेवर सांगते की,

(अ) त्याच्या जमिनीतून निसर्गत: वाहणारा पाण्याच्या प्रवाहास अडथळा (impeded) करण्यात आला आहे जे जमिनीच्या नुकसानाला (damage) कारणीभूत ठरू शकेल. अडथळा करणे म्हणजे वाहते पाणी मुक्तपणे पुढे जाण्यास अडचण होईल असे कृत्य करणे. अशा कृत्यामुळे पाण्याचा प्रवाह किंवा पाण्याचे वाहणे बंदच झाले पाहिजे असे नाही. अडवणे (obstruct) म्हणजे पाण्याच्या प्रवाहास प्रतिबंध करणे, प्रवाह बंद करणे.

(ब) त्याला अवैधपणे कोणत्याही मिळकतीतून हुसकावून (dispossess) लावण्यात आले आहे किंवा मिळकतीचा उपभोग घेण्यापासून वंचित (deprived) ठेवण्यात आले आहे.

(क) त्याला मिळकतीचा ताबा (possession) घेण्याचा किंवा जमीन वापरण्याचा (use) कायदेशीर हक्क (entitled) आहे.

➲ दाव्यात वय नमूद करण्याचे कारण म्हणजे संबंधित व्यक्ती सज्ञान आहे की अज्ञान आहे याची खात्री करणे.

➲ दावा लिहितांना खालील नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

**(१)** तुम्ही दाव्यात केलेली मागणी (claim) ज्या भौतिक सत्यावर (material facts) आधारीत आहे ती सर्व नमूद करा.

**(२)** फक्त वस्तूस्थिती, सत्यस्थिती (सत्य घटना) (facts) नमूद करा, कायदा (law) नको. उदा. तुम्ही कायदेशीर वारस असल्याचा दावा करीत असाल तर वंशावळ, नातेसंबंध नमूद करा.

**(३)** प्रतिवादीने केलेली कृती चुकीची, अयोग्य, बेकायदेशीर किंवा अधिकार नसतांना केलेली आहे हे खरे आहे असे वादीने प्रतिज्ञेवर सांगण्याची आवश्यकता नाही. त्याने फक्त तो दाव्यात करत असलेली मागणी ज्या भौतिक सत्यावर आधारीत आहे आणि प्रतिवादीने केलेले कृत्य कसे अयोग्य, बेकायदेशीर ठरते याबाबतची

**(४)** तुमच्या प्रकरणातील वस्तुस्थिती संक्षिप्तपणे परंतु अचूकपणे नमूद करावी.

➲ दाव्याला योग्य तो कोर्ट फी स्टँप लावावा.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**उदाहरण-१**

अ ला ब ने एका  मिळकतीतून हुसकावून लावले. परंतु ब विरूध्द मामलतदार न्यायालयात सहा महिन्याच्या कालावधीत कोणताही दावा न करता, सहा महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी अ मयत झाला. आता अ चा कायदेशीर वारस क, त्याच्याकडे दावा दाखल करण्याची मुदत असतांना, ब च्या विरूध्द मामलतदार न्यायालयात दावा दाखल करू शकेल काय?

या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक आहे. कारण ब ने क ला नव्हे अ ला मिळकतीतून हुसकावून लावले होते. ब ने मला मिळकतीतून हुसकावून लावले हे खरे आहे असे क ला न्यायालयासमोर प्रतिज्ञेवर सांगता येणार नाही.

परंतु, अ ने ब च्या विरूध्द मामलतदार न्यायालयात दावा दाखल केला असता आणि नंतर तो मयत झाला असता तर क, अ चा कायदेशीर वारस म्हणून, नियमांच्या आधिन राहून दावा चालवू शकला असता.

➲ 'प्रतिवादी' (defendant) म्हणजे:

(अ) ज्या व्यक्तीने जमिनीतून निसर्गत: वाहणारा पाण्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण केला आहे जो जमिनीच्या नुकसानाला कारणीभूत ठरू शकेल.

(ब) त्याने एखाद्या व्यक्तीला कोणत्याही मिळकतीतून अवैधपणे हुसकावून लावले आहे किंवा मिळकतीचा उपभोग घेण्यापासून वंचित ठेवले आहे.

**उदाहरण-१**

अ ला ब ने एका मिळकतीतून हुसकावून लावले. परंतु ब विरूध्द मामलतदार न्यायालयात सहा महिन्याच्या कालावधीत कोणताही दावा न करता, सहा महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी ब मयत झाला. आता ब चा कायदेशीर वारस ड आहे. दावा दाखल करण्याची मुदत असतांना, अ, ड च्या विरूध्द मामलतदार न्यायालयात दावा दाखल करू शकेल काय?

या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक आहे. कारण अ ला ड नव्हे, ब ने मिळकतीतून हुसकावून लावले होते.

परंतु, अ ने ब च्या विरूध्द मामलतदार न्यायालयात दावा दाखल केला असता आणि नंतर ब मयत झाला असता तर ड, ब चा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून, नियमांच्या आधिन राहून दावा चालवू शकला असता.

## ☞ कलम ८: विनंती अर्ज दावापत्र म्हणून समजणे

या जर एखादा विनंती अर्ज दाव्याच्या स्वरूपात नसून साध्या अर्जाच्या स्वरूपात मामलतदारला सादर केला गेला असेल आणि वादविषय या अधिनियमाच्या कलम ५ च्या कक्षेत येतो असे मामलतदारला दिसून आल्यास तो अशा अर्जदाराला या अधिनियमाच्या तरतुदी आणि स्वरूप समजावून सांगेल आणि अर्जदाराची तशी ईच्छा असल्यास, त्या अर्जावर तसा शेरा लिहून, तो अर्ज या अधिनियमाच्या कलम ७ अन्वये सादर केला गेला आहे असे समजण्यात येईल.

➲ दावापत्र मामलतदार यांना खुल्या न्यायालयातच (open court), वादी किंवा त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत समक्ष सादर केले गेले पाहिजे. दावापत्र मामलतदारच्या बंद खोलीत (chamber), घरात दिले, टेबलावर ठेवले, पोस्टाने पाठवले, लिपीकाला दिले तर ते अयोग्यप्रकारे सादर केले असे मानले जाईल. *(आय.एल.आर. ९, मुंबई- एच.सी.आर.- २५४)* कारण या जागा म्हणजे खुले न्यायालय (open court) नाही.

➲ सत्यापन किंवा इतर पूर्तता केली नाही म्हणून वादपत्र नाकारता येणार नाही. वादपत्रातील उणिवा, सुनावणीची संधी देऊन दुरूस्त करून घेणे ही मामलतदारची जबाबदारी आहे.

## ☞ कलम ९: वादीची शपथेवर तपासणी

या अधिनियमातील कलम ७ अन्वये नमूद केलेला मजकूर जर दावा पत्रात नसेल तर किंवा दावा पत्र अनावश्यक रित्या लांबलचक असेल तर, वरीलप्रमाणे दावापत्र तहसिलदार यांना समक्ष सादर केल्यानंतर मामलतदार  वादीची



Dr SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

शपथेवर तपासणी करेल आणि या अधिनियमातील कलम ७ अन्वये नमूद केलेला मजकूर, स्वतंत्र जोडपत्रावर (annexure) लिहून घेईल. सदर जोडपत्र दावा पत्राचा भाग बनेल. वादीला काही माहिती किंवा कागदपत्र जमा करण्यास अवधी हवा असेल तर मामलतदार आवश्यक तो कालावधी परिस्थितीनुरूप प्रदान करेल.

➲ शपथ म्हणजे देवाला साक्ष ठेऊन केलेले सत्य विधान. शपथेमध्ये पुष्टीकरण (affirmation) आणि घोषणा करणे (declaration) यांचा समावेश होतो. शपथ घेण्याबाबत कोणाची हरकत असल्यास तो दावा पत्राचे पुष्टीकरण करून तसे घोषित करू शकतो. पुष्टीकरण ही शपथ न घेता गंभीरतेने (solemnly) केलेली घोषणा असते.

➲ दावापत्रामधील दोष, मामलतदारने वादीची तपासणी करतांना दुरूस्त करून घ्यावे.

➲ दाव्यासाठी आवश्यक तपशील वादीने द्यावा म्हणून त्याला किती कालावधी द्यावा याबाबत या अधिनियमात उल्लेख नाही. मामलतदार याबाबत योग्य तो निर्णय घेऊ शकेल. वादी दिलेल्या कालावधीत शपथ घेण्यास किंवा पुष्टीकरण करण्यास किंवा आवश्यक तो तपशील पुरविण्यास टाळाटाळ करीत असेल तर मामलतदारला, लेखी कारणे नमूद करून दावा फेटाळता येईल.

**☞ कलम १०: दावापत्राचे पुष्टीकरण आणि सत्यापन**

दावापत्र खुल्या न्यायालयात सादर केले गेले, उपरोक्त कलम ९ अन्वये पुर्तता करण्यात आली त्यानंतर वादीने, मामलतदार समक्ष दावापत्रावर शेवटी समक्ष स्वाक्षरी करून खालीलप्रमाणे पुष्टीकरण आणि सत्यापन करणे आवश्यक आहे. पुष्टीकरण आणि सत्यापनाशिवाय दावा स्वीकारला जाणार नाही.

***"मी, (संपूर्ण नाव) ---------, वादी, असे जाहीर करतो की, या दावापत्रातील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे."***

*(खोटे सत्यापन सादर करणे हा भा.दं.वि.कलम १९३ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आहे.)*

वादी अज्ञान असल्यास, त्याचा नैसर्गिक पालक/आई स्वाक्षरी करू शकते. वादीने स्वत: स्वाक्षरी करणे अपेक्षीत आहे. 'वादी' किंवा 'प्रतिवादी' या व्याख्येत त्यांच्यामार्फत नियुक्त केलेला कायदेशीर प्रतिनिधीचा समावेश होत असला तरी 'कायदेशीर प्रतिनिधी (वकील)' यांचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा (independence and dignity) अबाधित ठेवण्यासाठी हे आवश्यक आहे असे मत अनेक उच्च न्यायालयांनी व्यक्त केले आहे.

**☞ कलम ११: दावापत्रावर शेरा नोंदवणे**

**(१)** मामलतदारने वरील प्रमाणे सर्व पूर्तता करून घेतल्यानंतर दावापत्रावर तसा शेरा नोंदवावा.

**(२)** वादी लिहू शकत नसेल तेव्हा दावापत्राशी संबंधित सत्यापन त्याच्यावतीने अन्य व्यक्तीकडून खुल्या न्यायालयात लिहून घ्यावे आणि सत्यापनाच्या अधिकृततेचे निदर्शक म्हणून वादीचा डाव्या हाताचा अंगठा उमटवावा आणि मामलतदारने समक्ष म्हणून स्वाक्षरी करावी.

**☞ कलम १२: दावापत्र नाकारणे**

दावापत्राची तपासणी केल्यानंतर जर मामलतदारच्या निदर्शनास आले की –

**(अ)** दावापत्रावर कलम ९ अन्वये करण्यात येणारे पुष्टीकरण आणि सत्यापन करण्यास वादीने नकार दिला आहे. किंवा

**(ब)** वादी कलम ९ अन्वये करण्यात येणारे पुष्टीकरण आणि सत्यापन करण्यास स तयार आहे किंवा त्याने तसे केले आहे परंतु कलम ७ अन्वये दाव्यासाठी आवश्यक माहिती, त्याने मुदत देऊनही मुदतीत सादर केलेली नाही. किंवा

**(क)** दावापत्राची छाननी केली असता –

*(१)* दावा मिळकत किंवा दाव्याचे स्वरूप कलम ५ मध्ये नमूद केल्यानूसार नाही किंवा,

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

*(२)* दाव्याचे कारण घडून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे.
**(ड)** कलम १० आणि ११ अन्वये नमूद केल्यानूसार पुष्टीकरण आणि सत्यापन करण्यास किंवा सही/अंगठा करण्यास वादी नकार देत आहे तर –

दावापत्रावर तसा शेरा नोंदवून मामलतदार दावापत्र नाकारू शकतील.

➲ दाव्यावर किंवा प्रतिवादीवर गंभीर परिणाम न करणारे हस्तदोष किंवा चुका मामलतदार, खुल्या न्यायालयात दुरूस्त करून घेऊ शकतील. हस्तदोष किंवा चुकांच्या कारणांवरुन दावा फेटाळला जाणार नाही.

**☞ कलम १३: दावापत्र परत करणे**

दावापत्राची तपासणी केल्यावर त्यातील विषय मामलतदारच्या अधिकारक्षेत्राबाहेरील आहे अशी मामलतदारची खात्री झाल्यास, योग्य न्यायालयात दावा सादर करण्याचा सल्ला देऊन आणि दावापत्रावर तसा शेरा नोंदवून मामलतदार दावापत्र परत करू शकतील.

➲ वादी किंवा/आणि प्रतिवादी मामलतदारच्या अधिकारक्षेत्रातील रहिवासी असावे असे या अधिनियमात कुठेही नमूद केलेले नाही. त्यामुळे वादी किंवा/आणि प्रतिवादी मामलतदारच्या अधिकारक्षेत्राबाहेरील रहिवासी असले तरी हरकत नाही. तथापि, दावा मिळकत ही मामलतदारच्या अधिकारक्षेत्रातीलच असावी.
➲ मामलतदारने, योग्य त्या न्यायालयात दावा सादर करण्यासाठी दावापत्र परत केले असेल तर, मामलतदार समोर सादर केलेल्या दावापत्रावर लावलेल्या कोर्ट फी स्टँपच्या रकमेइतकी सूट, ज्या न्यायालयात नंतर दावा दाखल केला जाईल तेथील कोर्ट फी स्टँपच्या रकमेत त्या न्यायालयामार्फत देण्यात येईल. *[विश्वेश्वरा वि. नायर, २३, मद्रास- ५६७ - (१९११) ; गणेश वि. तात्या, ए.आय.आर. १९२७ ; बॉम्बे २५७ ; ५९ एम.एल.जे. ८९९ ; ६१ एम.एल.जे. ४२३.]*

**☞ कलम १४: दावापत्र स्वीकारल्यानंतरची कार्यवाही**

**(१)** दावापत्र दाखल करून घेण्या योग्य असल्यास मामलतदार ते स्वीकारेल, त्यानंतर तात्काळ त्याबाबत सुनावणीची तारीख आणि उभय पक्षकारांच्या सोयीची जागा ठरवून, **अनुसूची अ** मध्ये प्रतिवादीला नोटीस काढेल. आणि अशा नेमलेल्या दिनांकास आणि ठिकाणी, वादीला दाव्याशी संबंधित इतर कागदपत्रांसह (काही असल्यास) आणि साक्षीदारांसह उपस्थीत राहण्याची सूचना करेल.
**(२)** सुनावणीचा दिनांक, नोटीस दिल्यानंतरच्या दिवसापासून दहा दिवसाच्या आतील आणि पंधरा दिवसानंतरचा नसावा. अपरिहार्य कारणास्तव या कालावधीत बदल करायचा असेल तर त्याची लेखी कारणे मामलतदारने नमूद करावीत.
**(३)** सुनावणीचे ठिकाण, मामलतदारचे कार्यालय किंवा दावा मिळकती जवळचे किंवा उभय पक्षकारांच्या सोयीने मामलतदारने ठरविलेले असावे.
➲ सुनावणीच्या आधी उभय पक्षकारांना नोटीस मिळाली आहे याची खात्री मामलतदारने करावी.
➲ सुनावणीची जागा उभय पक्षकारांच्या सोयीची आहे याची खात्री मामलतदारने करावी.
➲ जिल्हाधिकारी यांनी सुध्दा, या अधिनियमान्वये मामलतदारच्या आदेशाची फेरतपासणी करतांना, सुनावणीची जागा उभय पक्षकारांच्या सोयीची आहे याची खात्री करावी.
*(अनुसूची अ- नमुना खाली दिला आहे.)*

**☞ कलम १५: साक्षीदारांना हजर ठेवणे**

**(१)** दाव्याच्या सुनावणीसाठी कोणत्याही साक्षीदाराची आवश्यकता आहे असे वाटल्यास, मामलतदार आज्ञापत्र (summons) काढून अशा साक्षीदारास हजर राहण्याचा आदेश देऊ शकेल.



Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

(२) साक्षीदाराला आज्ञापत्र बजावूनही तो अपरिहार्य कारणाशिवाय गैरहजर राहिल्यास, मामलतदार, लेखी कारणे नोंदवून, अशा साक्षीदाराला अटक करण्याचे अधिपत्र (warrant) काढू शकेल. तथापि, या अधिनियमामध्ये, अशा प्रकारे अटक केलेल्या व्यक्तीस, मामलतदारने जामीन मंजूर करण्याची किंवा अटक केलेल्या व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्याची तरतुद नाही.

(३) सुनावणीचा, साक्षीदारांना हजर ठेवण्याचा व इतर खर्च नियमांत विहित केलेल्या पध्दतीने करण्यरात यावा.

➲ साक्षीदाराला अटक करण्याचे अधिपत्र काढण्याच्या आधी तो अपरिहार्य कारणाशिवाय गैरहजर होता, किंवा हजर राहण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ करीत आहे याची पुराव्यासह खात्री मामलतदारने करावी.

➲ साक्षीदार हजर करतो असे वादीने लिहून दिले होते म्हणून साक्षीदाराला आज्ञापत्र (summons) काढणे मामलतदारला टाळता येणार नाही.

➲ आज्ञापत्राची (summons) अवज्ञा करणे भा.द.वि. कलम १७४ अन्वये गुन्हा आहे.

| ☞ **कलम १६:** | **कसुरीमुळे दावा काढून टाकणे** |
|---|---|

(१) सुनावणीच्या तारखेस, वादी अपरिहार्य कारणाशिवाय गैरहजर राहिला किंवा त्याने दस्तऐवज सादर करण्यास किंवा साक्षीदारांना उपस्थित ठेवण्याच्या प्रयत्नात कसूर केला तर, त्याच ठिकाणी, खर्चासह दावा काढून टाकण्याचे अधिकार मामलतदारला आहेत. मग प्रतिवादी हजर असो किंवा नसो. परंतु प्रतिवादीने केलेले कृत्य मान्य केलेले नसावे.

(२) सुनावणीच्या तारखेस, नोटीस बजावल्यानंतरही प्रतिवादी अपरिहार्य कारणाशिवाय गैरहजर असल्यास, मामलतदार उपलब्ध साक्षी-पुराव्यांवरून एकतर्फी निर्णय घेऊ शकेल.

परंतु असे की, कलम १६(१) अन्वये मामलतदारने दावा काढून टाकण्याचा निर्णय दिला असेल किंवा कलम १६(२) अन्वये एकतर्फी निर्णय दिला असेल आणि असा निर्णय दिल्याच्या तीस दिवसाच्या आत वादी किंवा प्रतिवादी यांनी त्याच्या गैरहजेरीचे संयुक्तिक कारण मामलतदारांना पटवून दिले तर **अनुसूची ब** नुसार नोटीस काढून अशा दाव्याची चौकशी पुन्हा करणे विधीसंमत असेल.

*(अनुसूची ब- नमुना खाली दिला आहे.)*

परंतु पुढे असे की, प्रतिवादीस दाव्याचा खर्च दिल्यास, दावा काढून घेण्यास वादीला प्रतिबंध करता येणार नाही.

➲ उपरोक्त कलमान्वये कामकाज करतांना वाद निर्माण होऊ नये म्हणून नोटीस बजावल्याचा पुरावा उपलब्ध असल्याची खात्री मामलतदारने न चुकता करावी.

➲ नोटीस बजावल्याचा पुरावा म्हणून नोटीसीच्या प्रतीवर संबंधिताची स्वाक्षरी आणि आवश्यक असेल तर नोटीस बजावणाऱ्या कर्मचाऱ्याचे प्रतिज्ञापत्र आणि जबाब घेण्यात यावा.

➲ उपरोक्त तरतुदींचा अर्थ, मामलतदारला, वादी, प्रतिवादी यांच्या अनुपस्थितीच्या कारणांवरून दावा काढून टाकण्याचा अधिकार कायदाकारांनी दिला आहे असा घेता येणार नाही. वादी, प्रतिवादी यांना सुनावणीच्यावेळी सादर करण्यासाठी कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत किंवा सुनावणीला गैरहजर राहून किंवा अन्य कारणे समोर करून सुनावणीसाठी सतत पुढील तारीख मागण्याची संधी मिळू नये असा कायदाकारांचा उद्देश आहे.

➲ सुनावणीच्या तारखेस, प्रतिवादी अपरिहार्य कारणाशिवाय गैरहजर असल्यास, मामलतदार उपलब्ध साक्षी-पुराव्यांवरून एकतर्फी निर्णय घेऊ शकेल. परंतु यावेळी नोटीस बजावल्यानंतरही वादी आणि प्रतिवादी दोघेही गैरहजर असावे.

➲ सुनावणीच्या तारखेस, वादी सतत गैरहजर आहे, त्याने कोणतेही साक्षीपुरावे सादर केले नाहीत म्हणून मामलतदारे दावा काढून टाकला. त्यानंतर तीस दिवसाच्या आत वादीकडून पुन्हा सुनावणी घेण्याची विनंती करण्यात आली नाही तर वादीला त्याच वाद कारणासाठी नव्याने कोठेही दावा दाखल करता येणार नाही. *[रामचंद्र वि. भिकीभाई, पी.जे. (१८८२) पान नं. १६०]*

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**☞ कलम १७: सुनावणी पुढे ढकलणे**

**(१)** कलम १६ (२) मध्ये नमुद केल्याप्रमाणे वादी किंवा प्रतिवादी किंवा साक्षीदार गैरहजर राहिल्याचे कारण यांच्यावर सुनावणीची नोटीस योग्य पध्दतीने बजावली गेली नव्हती अशी मामलतदारची खात्री पटल्यास पुन्हा नवीन नोटीस बजावून, सुनावणीसाठी पुढील तारीख देता येईल.

**(२)** आज्ञापत्र काढून बोलाविलेला साक्षीदार किंवा ज्याच्या नावे अटकेचे अधिपत्र काढलेले होते ती व्यक्ती, अपरिहार्य कारणांमुळे गैरहजर राहिली याची पुराव्यासह खात्री पटल्यास, अशा व्यक्ती हजर होईपर्यंत सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याचा मामलतदारला अधिकार आहे.

**(३)** मामलतदारला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी, लेखी कारणे नमूद करून, चौकशीचे काम स्थगित ठेवण्याचा मामलतदारला अधिकार आहे तथापि, हा कालावधी दहा दिवसांपेक्षा जास्त नसावा.

**(४)** कलम १५ आणि १६ च्या तरतुदी, या कलमान्वये दाव्याची सुनावणी ज्या दिवसापर्यंत तहकूब केली असेल त्या कोणत्याही दिवसाच्या बाबतीत, जणू काही तो दिवस त्या सुनावणीसाठी नेमलेला मूळ दिवस असल्याप्रमाणे लागू असतील.

➲ सुनावणीची तहकुबी हा नियम समजता कामा नये. कोणत्याही तहकुबीचा कालावधी पंधरा दिवसांपेक्षा जास्त असू नये.

➲ गैरहजेरीचे पुरेसे कारण म्हणजे: (१) नोटीस/आज्ञापत्र/अधिपत्र योग्य व्यक्तीवर न बजावता त्याच्याशी संबंधित अज्ञान व्यक्तीवर बजावले जाणे. (२) वकीलाने किंवा वकीलाच्या कारकुनने सुनावणीची तारीख योग्य व्यक्तीला न कळविणे (३) गंभीर आजार होणे (४) अपघात होणे.(५) नोटीस/आज्ञापत्र/अधिपत्र उशीरा बजावले जाणे इत्यादी.

**☞ कलम १८: अवयस्क पक्षकार व अधिक पक्षकार, पक्षकाराचा मृत्यू**

**(१)** अवयस्क/अज्ञान पक्षकाराचे प्रतिनिधीत्व त्याचे नैसर्गिक किंवा नियुक्त पालक करीत असल्यास त्याला किंवा त्याच्याविरूध्द दावा दाखल करता येईल.

**(२)** मामलतदारला योग्य आणि आवश्यक वाटल्यास, कोणत्याही वेळी, दावा मिळकतीशी संबंधित कोणत्याही व्यक्तीस पक्षकार म्हणून दाव्यात सामील करून घेता येईल.

परंतु कोणत्याही व्यक्तीस, त्याच्या संमतीशिवाय वादी म्हणून सामील करून घेता येणार नाही.

परंतु पुढे असेकी, अशा प्रकारे सामील करून घेतलेल्या कोणत्याही इसमाच्या बाबतीत, दावा अनिर्णीत असतांना, तो हस्तांतरिती (transferee) नसेल तर, कलम ५(३) च्या कारणाकरिता, त्याचे नाव ज्या दिवशी सामील करण्यात आले त्यादिवशी दावा दाखल करण्यात आला असे समजण्यात येईल.

**(३)** दावा अनिर्णीत असतांना कोणताही पक्षकार मयत झाल्यास,

***(अ)*** अशा मृत्युनंतर एक महिन्याच्या आत अर्ज करण्यात आला असेल तर मामलतदारने, मयत पक्षकाराचा वैध प्रतिनिधी कोण याची संक्षिप्त चौकशी करून, अशा वैध प्रतिनिधीचे नाव अभिलेखात दाखल केले पाहिजे.

***(ब)*** वरील प्रमाणे अर्ज करण्यात आला नाही तर दावा रद्द (abate) करण्यात येईल.

**(४)** कोणत्याही इसमाचे नाव प्रतिवादी किंवा मयत पक्षकाराचा वैध प्रतिनिधी म्हणून अभिलेखात दाखल करतांना, मामलतदारने त्याला कलम १४ अन्वये नोटीस देणे आवश्यक आहे. आणि नोटीसीत सुनावणीसाठी नमुद केलेल्या तारखेस सुनावणीचे कामकाज सुरू करण्यात यावे.

जिल्हाधिकारी यांच्यासमोर या अधिनियमान्वये मामलतदारच्या आदेशाच्या फेरतपासणीचे कामकाज सुरू असतांना जर वादी मयत झाला तर दावा रद्द होणार नाही. तीस दिवसाच्या कालावधीनंतरही मयताच्या वैध प्रतिनिधीचे नाव अभिलेखात दाखल होऊ शकेल. *(हफसजी इब्राहीम वि. मंगलगिरजी मथुरागिरजी, ४७, बॉम्बे एल.आर.८४५.)*

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

☞ **कलम १९:** **सुनावणीच्या वेळी तपासावयाचे मुद्दे**

**(१)** सुनावणीच्या किंवा ज्या दिवसापर्यंत कामकाज तहकूब करण्यात आले होते त्या दिवशी, कलम १६ च्या आधिन राहून मामलतदारने दाव्यातील किंवा सादर केलेल्या पुराव्यातील प्रत्येक मुद्द्याची स्वत: चौकशी करावी. म्हणजे -

***(अअ)*** वादीचे म्हणणे असेल की, प्रतिवादीने उभारलेल्या कोणत्याही अडथळयामुळे, त्याच्या जमिनीतून वाहणारा पाण्याचा प्रवाह अडविला गेला आहे ज्यामुळे वादीच्या जमिनीस किंवा जमिनीवरील गुरचरण जागेस, झाडांस, पिकांस नुकसान पोहोचले आहे किंवा नुकसान पोहोचण्याचा संभव आहे तर मामलतदारने खात्री करावी की,

***(१)*** वादीच्या जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहणारे पाणी, नैसर्गिकरित्या वादीच्या जमिनीतून प्रतिवादीच्या जमिनीकडे वाहत होते किंवा कसे?

***(२)*** अशा प्रवाहात प्रतिवादीने अवैधरित्या कोणताही अडथळा उभारला आहे किंवा कसे?

***(३)*** अशा नैसर्गिक प्रवाहात उभारलेला अडथळा, दावा दाखल करण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत उभारला आहे किंवा कसे?

***(४)*** अशा अडथळयामुळे वादीच्या जमिनीस किंवा जमिनीवरील गुरचरण जागेस, झाडांस, पिकांस नुकसान पोहोचले आहे किंवा नुकसान पोहोचण्याचा संभव आहे किंवा कसे?

***(अ)*** वादीचे म्हणणे असेल की, प्रतिवादीने कोणत्याही मालमत्तेवरील त्याचा कब्जा किंवा उपयोग अवैधपणे हिरावून घेतला आहे तर मामलतदारने खात्री करावी की,

***(१)*** सदर मालमत्तेचा कब्जा किंवा उपयोग वादीकडे किंवा वादीच्यावतीने अन्य व्यक्तीकडे, दावा दाखल करण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी होता किंवा कसे?

***(२)*** दावा दाखल करण्याच्यावेळी प्रतिवादीकडे सदर मिळकतीचा कब्जा आहे किंवा कसे? आणि असेल तर असा कब्जा प्रतिवादीने वैधरित्या मिळविला आहे किंवा कसे?

***(ब)*** वादीचे म्हणणे असेल की, कोणत्याही मालमत्तेचा कब्जा किंवा उपयोग परत मिळण्यास तो पात्र आहे आणि प्रतिवादीचा सदर मिळकतीवरील कोणताही हक्क संपल्यामुळे त्या मालमत्तेचा कब्जा किंवा उपयोग परत मिळण्यास तो पात्र आहे तर मामलतदारने खात्री करावी की,

***(१)*** प्रतिवादीकडे त्या मालमत्तेचा कब्जा किंवा उपयोगाचा अधिकार वादीकडून किंवा त्याने ज्याच्या मार्फत दावा दाखल केला आहे त्याच्याकडून प्राप्त झाला आहे किंवा कसे?

***(२)*** दावा दाखल करण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी असा अधिकार संपला आहे किंवा कसे?

***(३)*** प्रतिवादी हा दावा दाखल होण्याच्या लगतपूर्व बारा वर्षाच्या काळात, दावा जमिनीचा पूर्वीचा मालक किंवा अंशत: मालक किंवा मालकाचा किंवा अंशत: मालकाचा वैध प्रतिनिधी आहे किंवा कसे?

***(क)*** वादीचे म्हणणे असेल की, त्या मालमत्तेचा कब्जा किंवा उपयोगाचा अधिकार अद्याप वादीकडेच आहे परंतु प्रतिवादी त्याच्या या कब्ज्याला किंवा उपयोगाला हरकत करत आहे किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहे तर मामलतदारने खात्री करावी की,

***(१)*** दाव्यातील मालमत्तेचा कब्जा किंवा उपयोगाचा अधिकार वादीच्या किंवा वादीच्या वतीने कोणत्याही व्यक्तीच्या प्रत्यक्ष कब्ज्यात किंवा उपयोगात आहे किंवा कसे?

***(२)*** प्रतिवादी, वादीच्या कब्ज्याला किंवा उपयोगाला हरकत करत अणत आहे किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा कसे?

***(३)*** अशा हरकतीची किंवा अडथळयाची सुरूवात दावा दाखल करण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत झाली होती किंवा कसे?

**(२)** न्यायदानाच्या कामात मदत व्हावी म्हणून, मामलतदारास योग्य आणि आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, योग्य ती नोटीस किंवा आज्ञापत्र काढून बोलविण्याचा, त्यांची तपासणी करण्याचा, कोणताही दस्तएवज हजर करण्यास सांगण्याचा किंवा तसे करण्यासष भाग पाडण्याचा, मालमत्तेला किंवा वाद जागेला भेट देण्याचा, पाहणी करण्याचा अधिकार असेल. अशी पाहणी केल्यानंतर मामलतदारने संबंधित मुद्द्यांचे टाचण, पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर करावे. असे टाचण दाव्यातील कागदपत्रांचा एक भाग समजले जाईल.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**(३)** साक्षीदारांच्या तपासणीचे काम चालू असतांना मामलतदार, अशा साक्षीबाबतचे संक्षीप्त टाचण स्वहस्ताक्षरात लिहून काढेल. त्याबाबतचे निष्कर्ष नोंदवून त्यावर स्वाक्षरी करेल.
(४) वादाबाबत मामलतदाराचा निर्णय वादीच्या बाजूने असेल तर, मामलतदार कलम ५ अन्वये त्याच्याकडे असलेल्या अधिकाराचा वापर करून आणि अधिकारमर्यादेत राहून त्याला योग्य वाटेल तसा आदेश पारित करेल. आणि जर मामलतदाराचा निर्णय प्रतिवादीच्या बाजूने असेल तर तो दावा काढून टाकेल. वरीलपैकी कोणत्याही बाबतीत बजावणीचा खर्च, ज्याच्याविरूध्द निर्णय होईल त्याने दिला पाहिजे.
या अधिनियमाखालील प्रकरणे तातडीने निकाली काढणे अपेक्षीत असले तरी कोणत्याही प्रकरणाचा निर्णय देण्यापूर्वी
➲ मामलतदारने पक्षकारांचा युक्तीवाद ऐकून घेणे त्यावर बंधनकारक आहे. तो पक्षकारांचा हक्क आहे *[मोतीलाल वि. पानाजी, पुनरीक्षण अपील, २८५ (१९६०)]*
➲ अवैधरित्या कोणत्याही मिळकतीचा ताबा घेणे आणि ती मिळकत पट्ट्याने देणे ही बाब बेकायदेशीरच आहे. असा प्रकार असल्यास संबंधित सर्व व्यक्तींना कलम १८ अन्वये प्रतिवादी करण्यात यावे.
➲ जेव्हा वादी दावा पुढे न चालविण्याची ईच्छा व्यक्त करेल तर त्याने प्रतिवादीला दाव्याचा खर्च दिल्यावर, मामलतदारने त्याला तशी परवानगी द्यावी.
➲ **तडजोड करणे:** तडजोड म्हणजे पक्षकारांनी असलेला वाद पक्षकारांनी आपसात ठरलेल्या अटींनुसार मिटविणे.

**उदाहरण १**

अ हा वादी ब या प्रतिवादी विरूध्द दावा दाखल करतो. सुनावणीच्यावेळेस उभय पक्षकार त्यांच्या साक्षीदारांसह हजर राहतात. परंतु ब म्हणतो की अ मिळकतीवर ताबा मागत नसेल तर तो अ ला भाडे देण्यास तयार आहे. अ याला संमती देतो. यावरून असे दिसून येते की ब ला दाव्यातील मागणी मान्य आहे. अशा परिस्थितीत मामलतदारने अ च्या बाजुने निकाल द्यावा आणि अ ला तात्काळ ताबा देण्याचा आदेश पारित करावा. ब ला भाडेकरू म्हणून ठेवावे की नाही ही अ ची मर्जी आहे. मामलतदार ब ला आदेश देऊ शकत नाही की ब ला भाडेकरू म्हणून ठेवावे.

**उदाहरण २**

अ आणि ब हे दोघेही सुनावणीच्यावेळेस त्यांच्या साक्षीदारांसह हजर राहतात. आणि आपसात तडजोड करून मामलतदारला विनंती करतात की, मामलतदारने असा आदेश पारित करावा की, उभय पक्षकारांनी न्यायालयाच्या बाहेर आपसात तडजोड केली आहे आणि प्रत्येक पक्षाने दाव्याचा खर्च स्वत:चा स्वत: करावा. अशा परिस्थितीत मामलतदारने दावा फेटाळून लावण्याचा पारित करावा आणि वादीने प्रतिवादीला दाव्याचा खर्च द्यावा असे आदेशीत करावे. मामलतदार दाव्याचा खर्च विभागू शकत नाही किंवा खर्च स्वत:चा स्वत: करावा असा आदेश देऊ शकत नाही. पक्षकारांनी ते आपसात ठरवावे.
➲ या अधिनियमात तरतुद न केलेल्या तरतुदीनुसार मामलतदारने आदेश करू नये. मामलतदाराचा प्रत्येक आदेश या अधिनियमातील तरतुदीनुरूपच असावा.
➲ जरी वादीने येऊन सांगितले की उभय पक्षात आपसात तडजोड झाली आहे त्यामुळे दावा रद्द करावा आणि आम्ही दाव्याचा खर्च स्वत:चा स्वत: सहन करू तरीही मामलतदारने दावा फेटाळून लावण्याचा पारित करावा आणि वादीने प्रतिवादीला दाव्याचा खर्च द्यावा असे आदेशीत करावे.

**☞ कलम २०: मामलतदारने आदेश दावापत्रावर लिहिणे आणि वाचून दाखविणे**

मामलतदारचा प्रत्येक आदेश, मग तो दावा काढून टाकण्याबाबत असो किंवा दावा परत करण्याबापबत असो किंवा दावा मान्य किंवा फेटाळण्याबाबत असो. मामलतदारने प्रत्येक आदेश दावापत्रावर लिहिला पाहिजे आणि ताबडतोब किंवा पक्षकारांना नोटीस देऊन हजर ठेवले असेल त्यादिवशी खुल्या न्यायालयात वाचून दाखवला पाहिजे. आणि त्या आदेशाची कारणे त्याने थोडक्यात नमुद केली पाहिजेत.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

➲ या कलमान्वये मामलतदारने पारित केलेला प्रत्येक आदेश खुल्या न्यायालयात वाचून दाखविणे बंधनकारक (obligatory) आहे.

➲ मामलतदारला दावा परिस्थितीनुरूप पूर्णत: किंवा अंशत: मान्य करण्याचा अधिकार आहे.

➲ दाव्याचा निकाल झाल्यानंतर, सहा महिन्यांनंतर, पक्षकारांच्या विनंतीनुसार पक्षकारांनी सादर केलेली कागदपत्रे त्याबाबत पोहोच घेऊन परत देता येतील.

➲ दाव्यातील मार्गाचे, जलप्रवाहाचे, वादादीत सीमांबाबतचे इत्यादी नकाशे आणि आराखडे (maps & plans), दाव्याचा निकाल झाल्यानंतर तीस वर्षासाठी जतन करावेत. दाव्यातील इतर कागदपत्रे पाच वर्षानंतर नष्ट करता येतील.

➲ लबाडीने खोटा दावा दाखल करणाऱ्या पक्षकारांविरूध्द भा.दं.वि. कलम २०९ किंवा २१० अन्वये गुन्हा दाखल करावा.

➲ मामलतदारने या अधिनियमान्वये दिलेला आदेश त्याला स्वत:ला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम २५८ चा वापर करून पुनर्विलोकनात घेण्याचा कोणताही अधिकार नाही. (लाला दगडू काळे वि. अप्पर आयुक्त, नाशिक व इतर- उच्च न्यायालय, मुंबई-३९५३/२००९)

☛ **<u>कलम २१:</u>** **<u>मामलतदारच्या आदेशाची अंमलबजावणी</u>**

**(१)** जेव्हा मामलतदारचा आदेश अडथळा काढून टाकण्याबाबत (removal of an impediment) किंवा कब्जा देण्याबाबत (awarding possession) किंवा उपयोग चालू करण्याबाबत (restoring a use) असेल तेव्हा त्याला तो निर्णय ग्राम अधिकाऱ्यास किंवा त्याच्या अधिनस्त असलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यास आदेश देऊन किंवा त्याला योग्य वाटेल त्या पध्दतीने अंमलात आणता येईल.

परंतु, या अधिनियमात काहीही नमुद असले तरी, वरील प्रमाणे आदेश देतांना दावा जमिनीत प्रतिवादीने स्वखर्चाने पेरलेले पीक असेल तर आणि असे पीक चांगल्या हेतुने पेरलेले असल्याची मामलतदारची खात्री झाल्यास किंवा प्रतिवादीने दाव्याच्या खर्चाबाबत योग्य त्या तारणासह (security) किंवा रक्कमेसह विनंती अर्ज दिल्यास,

(अ) त्या पिकाची अशा वेळेस, शासकीय आकारणी सह जी किंमत असेलती वादी प्रतिवादीस देण्याचे कबूल करे पर्यंत, किंवा

(ब) वादी उपरोक्त रक्कम देण्यास तयार नसेल तर, प्रतिवादी असे पीक काढून घेईपर्यंत मामलतदार स्वत:चा वरील प्रमाणे दिलेला आदेश स्थगित ठेवील.

उपरोक्त (अ) अन्वये ठरलेली रक्कम जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

**(२)** मामलतदारने मनाई आदेश (injunction) देण्याचा निर्णय घेतला असेल तेव्हा तो असा मनाई आदेश **<u>अनुसूची बब</u>** किंवा **<u>अनुसूची क</u>** मध्ये तयार करेल आणि प्रतिवादी हजर असल्यास त्याला त्याच वेळेस बजावेल आणि प्रतिवादी हजर नसल्यास ग्राम अधिकाऱ्यामार्फत किंवा त्याच्या अधिनस्त असलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यामार्फत किंवा त्याला योग्य वाटेल त्या पध्दतीने बजावता येईल.

*(अनुसूची बब आणि क नमुना खाली दिला आहे.)*

**(३)** जेव्हा मामलतदारने खर्च देण्याचा निर्णय घेतला असेल तेव्हा अशा खर्चाची रक्कम, ज्याला असा आदेश दिला असेल अशा पक्षकाराकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

**(४)** मामलतदारने उपकलम (२) अन्वये दिलेल्या मनाई आदेशाची अवज्ञा, भा.दं.विधान कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असेल.

➲ मामलतदारने त्याच्या आदेशांची अंमलबजावणी ताबडतोब करणे आवश्यक आहे. आदेशाच्या अंमलबजावणीस विलंब झाल्यास संबंधित पक्षकारांच्या हितसंबंधाना बाधा पोहोचते. *(भगवानलाल वि. छबीलभाई, पी.जे.१८९६, पी. ६००)*

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

➲ मामलतदारला योग्य वाटल्यास आणि आवश्यक असेल तर पोलीस अधिकाल्याला आदेश देऊन त्याच्या मार्फतही आदेशाची अंमलबजावणी करून घेता येईल.

➲ या अधिनियमात 'डीक्री' (decree) हा शब्द कुठेही वापरण्यात आला नाही 'निर्णय' (decision) या शब्दाचाच वापर करण्यात आला आहे हे लक्षात घ्यावे.

➲ मामलतदारने या अधिनियमान्वये दिलेल्या ताब्याच्या आदेशाची अंमलबजावणी करतांना, घराचे दार बंद करून प्रतिकार केला असता, आवश्यक असल्यास घराचे दार फोडून ताबा देण्यात काहीही चूक नाही. *(बाजी देव वि. सदाशिव भाई शंकर, ५-बॉम्बे, उच्च न्यायालय , आर. १५८)*

➲ मामलतदारने या अधिनियमान्वये दिलेल्या अडथळा काढण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करतांना प्रतिकार केला असता, ग्राम अधिकाऱ्याने योग्य त्या बळाचा वापर केला तर ते चूक नाही. *(शंकर रामलाल वि. मार्तंड भाऊ, १४-बॉम्बे, उच्च न्यायालय , १५७)*

➲ मामलतदारने या अधिनियमान्वये दिलेल्या ताब्याच्या आदेशाची अंमलबजावणी करतांना, ग्राम अधिकाऱ्याने किंवा मामलतदारच्या अधिनस्त असलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने, समक्ष जागेवर जाऊन प्रत्यक्षात (actual) ताबा द्यावा. ताबा प्रतिकात्मक (symbolic) नसावा.

➲ मामलतदारने या अधिनियमान्वये दिलेल्या ताब्याच्या आदेशाची अंमलबजावणी करतांना, अवैध कब्जा असलेल्या प्रतिवादीचे नातेवाईक, आई, वडील, नोकर इत्यादी, दाव्यात सहप्रतिवादी नसतील आणि अवैधरित्या कब्ज्यात असलेल्या प्रतिवादीच्या कब्ज्यात असलेल्या जागेत राहात असतील तर त्यांनाही कब्जा सोडावा लागेल. *(नाना वि. पांडुरंग, ९-बॉम्बे, उच्च न्यायालय , ९७)*

| ☞ **कलम २२:** | **पक्षकाराच्या हक्कास बाधा येऊ न देणे** |
|---|---|

मामलतदारने कलम २३(२) अन्वये ज्याच्या लाभात अडथळा काढून टाकण्याचा किंवा ताबा देण्याचा किंवा उपयोग करण्याचा आदेश दिला असेल त्यापक्षकाराने सक्षम दिवाणी न्यायालयाकडून किंवा अन्य सक्षम न्यायालयाकडून हुकूमनामा किंवा आदेश देण्यात येईपर्यंत त्याच्या जमिनीच्या पृष्ठभागावरील पाण्याचा प्रवाह, लगतच्या जमिनीवर अडथळा होणार नाही अशा पध्दतीने वाहू दिला पाहिजे किंवा कब्जा किंवा उपयोग चालू ठेवला पाहिजे.
परंतु प्रथमत: असे की, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, ज्या पक्षकाराविरूध असा आदेश दिला गेला असेल, त्या पक्षकारास ज्या मुदतीपर्यंत कोणत्याही मालमत्तेच्या कब्ज्यापासून दूर ठेवण्यात आले असेल किंवा उपयोग करू दिला गेला नसेल त्या मुदतीत उत्पन्न दिवाणी न्यायालयात दावा करून वसूल करण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.
परंतु दुसरे असे की, कोणत्याही मालमत्तेच्या कब्जा किंवा उपयोगाबाबत किंवा कलम २१ (१) अन्वये व्यवस्था केलेल्या कोणत्याही पिकावरील हक्क किंवा किंमतीबाबत मामलतदारने दिलेला निर्णय हा कोणत्याही दिवाणी न्यायालयात त्याच पक्षकारांच्या किंवा त्यांच्या तर्फे दावा करणाऱ्या इतर व्यक्तींच्या दरम्यान नंतर होणाऱ्या कोणत्याही दाव्यात किंवा इतर कामकाजात निर्णायक असेल असे समजता कामा नये.

➲ या अधिनियमान्वये मामलतदारने दिलेला निर्णय दिवाणी न्यायालयाला रद्द करता येत नसला तरी दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याने (decree) अधिक्रमित (superseded) केला जाऊ शकेल. तो निर्णय झालेला वादप्रश्न (res-judicata) होणार नाही.

➲ ताब्याचा (possession) प्रश्न अनेकदा मालकी हक्काच्या (title) प्रश्नात मिसळला जातो ज्याचा निर्णय करण्याचा अधिकार फक्त दिवराणी न्यायालयालाच आहे.

➲ या अधिनियमान्वये सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे मामलतदारने काढून टाकलेल्या दाव्याविरूध्द उच्च न्यायालयात दाखल झालेला दावा, मामलतदारकडे तीस दिवसाच्या आत फेरअर्ज करण्याची तरतुद मामलतदार न्यायालय अधिनियमात असल्यामुळे उच्च न्यायालयात फेटाळण्यात आला.



Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

☛ **कलम २३:** **अपीलास प्रतिबंध**

**(१)** या अधिनियमान्वये मामलतदारने पारित केलेल्या आदेश किंवा निर्णयावर अपील करता येणार नाही.

**(२)** परंतु जिल्हाधिकाऱ्यांना, या अधिनियमान्वयेच्या कोणत्याही दाव्याची कागदपत्रे मागविण्याचा आणि अशा दाव्यातील कोणतेही कामकाज, निर्णय, आदेश, निष्कर्ष तपासण्याचा आणि कामकाज, निर्णय, आदेश, निष्कर्ष अयोग्य किंवा अवैध आहेत असे आढळून आल्यास, संबंधित पक्षकारांना योग्य ती नोटीस देऊन, या अधिनियमाशी सुसंगत असे योग्य ते आदेश पारित करण्याचा अधिकार असेल.

**(२-अ)** जिल्हाधिकारी, त्यांना या कलमान्वये प्राप्त अधिकार, सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहाय्यक आयुक्तांना प्रदान करू शकतात.

**(३)** सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहाय्यक आयुक्तांना यांनी या अधिनियमान्वये चालविलेले कामकाज, या अधिनियमान्वये न्यायालयीन कामकाज आहे असे समजण्यात यावे.

➲ या कलमाचा उद्देश, मामलतदारने जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली या अधिनियमाचे कामकाज करावे हा आहे.

➲ कलम १९ ची मर्यादा असल्यामुळे, जिल्हाधिकारी किंवा त्यांच्यावतीने काम करणारे सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिका किंवा सहाय्यक आयुक्त यांना अतिरिक्त पुरावे घेता येणार नाहीत किंवा खर्चाचा आदेश देता येणार नाही. त्यांच्या सुनावणीत कलम १९ च्या त्रुटीबाबत समोर आलेले मुद्दे नमुद करून प्रकरण फेर सुनावणीसाठी मामलतदारकडे पाठवावे लागेल.

➲ कलम २३(२-अ) अन्वये जिल्हाधिकारी, त्यांना कलम २३ अन्वये प्राप्त अधिकार, सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहाय्यक आयुक्तांना प्रदान करू शकतात. अशी स्पष्ट तरतुद आहे. यात उपविभागीय अधिकारी (sub divisional officer) चा समावेश नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना २३ अन्वये प्राप्त अधिकार, उपविभागीय अधिकारीला प्रदान करता येणार नाहीत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम १३ चा अर्थ मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ ला लागू होणार नाही. तसेच सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिका किंवा सहाय्यक आयुक्त यांना असे अधिकार प्रदान करतांना त्याबाबत स्पष्ट लेखी आदेश पारित करणे आवश्यक आहे. ***(नारायण भगवान भोलणकर वि. दत्तात्रय दिगंबर तायडे- ४६०९/२०१५- उच्च न्यायालय, मुंबई, दि. २८.४.२०१६)***

➲ जिल्हाधिकाऱ्यांनी फेरतपासणीत पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी, मामलतदारला कलम २१ अन्वये विहित केलेल्या तरतुदीनुसार करावी लागेल.

➲ जिल्हाधिकारी किंवा त्यांच्यावतीने काम करणारे सहाय्यक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिका किंवा सहाय्यक आयुक्त यांनी फेरतपासणीत अंतीम आदेश पारित करू शकतात.

➲ या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले अधिकार, दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ११५ अन्वये उच्च न्यायालयाला दिलेल्या अधिकारांच्या समकक्ष आहेत.

➲ या अधिनियमात, जिल्हाधिकाऱ्यांकडे फेरतपासणी साठी अर्ज करण्याची निश्चित कालमर्यादा नमुद केलेली नाही. तथापि, या अधिनियमान्वये चालणारी प्रकरणे ही संक्षिप्त कार्यवाही (summary proceedings) असते आणि त्यात तत्काळ दिलासा (immediate relief) मिळणे हा सदर कायद्याचा उद्देश आहे. जिल्हाधिकारी यांनी फेरतपासणी प्रकरणात, उच्च न्यायालयात पुनरीक्षण याचिका (revision petition) दाखल करण्याबाबत प्रचलीत असणाऱ्या पध्दतीचा अवलंब करणे अपेक्षीत असल्यामुळे, त्याप्रमाणे ६० दिवसाची कालमर्यादा पाळावी. थोडक्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे फेरतपासणीसाठी अर्ज दाखल करण्याची कालमर्यादा साठ दिवस असेल.

➲ पुनरीक्षणासाठीच्या अर्जावर विचार करतांना, अपील अर्जावर विचार करतात तसा विचार करता येणार नाही. पुनरीक्षणासाठीच्या अर्जावर विचार करतांना खालील तीन मुद्दे विचारात घ्यावेत.

(१) सदरचा आदेश करण्याचा खालच्या न्यायालयाला अधिकार होता.

(२) सदर प्रकरणात खालच्या न्यायालयाने आपल्या अधिकाराचा वापर करणे आवश्यक होते.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

(३) ह्या अधिकारांचा वापर करतांना खालचे न्यायालयाने कायद्याविरूध्द कृत्य केलेले नाही किंवा ते गैर कायदेशीर वागलेले नाही किंवा नियमबाह्य कृती केलेली नाही.
या तीन बाबतीत जर वरिष्ठ न्यायालयाचे समाधान झाले तर वरिष्ठ न्यायालयाचे मत जरी खालच्या न्यायालयापेक्षा वेगळे असले तरीही वरिष्ठ न्यायालयाला खालच्या न्यायालयाचा निकाल बदलता येणार नाही.
खालील न्यायालयाने केलेल्या चुका जर तथ्यांच्या बाबतीत असोत किंवा कायद्याच्या बाबतीत असोत, जर अधिकारीतेशी संबंधित असतील तरच वरिष्ठ न्यायालयास खालच्या न्यायालयाचा निकाल फिरविता येईल.
*(ए.आय.आर.१९७२-सर्वोच्च न्यायालय-२३७९ ; ए.आय.आर.१९७१-सर्वोच्च न्यायालय-२३२४ ; ए.आय.आर.१९७५-सर्वोच्च न्यायालय-७९४ ; ए.आय.आर.१९७३-सर्वोच्च न्यायालय- ७६.)*

➲ **अयोग्य किंवा बेकायदेशीर** (improper or Illegal) **आदेशांची उदाहरणे:**

(१) कायदेशीरपणे दाखल होण्यास पात्र असलेले दावे दाखल करून घेण्यास नकार देणे.
(२) वादीने सादर केलेल्या आधारहीन पुराव्यांच्या आधारावर निष्कर्ष काढणे.
(३) मुदतबाह्य असलेले दावे दाखल करून घेणे.
(४) आवश्यक पक्षकार दाव्यात दाखल करून घेण्यास नकार देणे.
(५) प्रतिवादीला नोटीस बजावल्याचा पुरेसा पुरावा उपलब्ध नसतांना एकतर्फी सुनावणी घेणे किंवा एकतर्फी निर्णय देणे.
(६) दावा काढून घेण्याची मागणी फेटाळणे.
(७) सुनावणीस अनुपस्थित रहाण्याचे पुरेसे कारण सादर करूनही फेर सुनावणी न घेणे.
(८) पुरावा दाखल करून घेण्यास नकार देणे.
(९) पक्षकारांना नोटीस न बजावता स्थानिक चौकशी/स्थळ पाहणी करणे.
(१०) प्रत्यक्ष ताबा नसणाऱ्या वादीला ताबा देणे.
(११) सामाईक ताबा देण्याचा आदेश करणे.
(१२) पुराव्यासह सिध्द झालेली दावा (claim) मान्य करण्यास नकार देणे.
(१३) वाद विषयावर (issues) निष्कर्ष (findings) काढण्यास अपयश.
(१४) दावा जमिनीत पिके नसतांनाही तत्काळ ताबा देण्यास नकार देणे/हयगय करणे.
(१५) दावा जमिनीत सद्हेतुने लावलेली पिके कापणीला आलेली असतांना आणि प्रतिवादी योग्य ती हमी देण्यास तयार असतांना, पारित केलेल्या ताब्याच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार देणे.

➲ या अधिनियमात, मामलतदारच्या आदेशाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपील दाखल करण्याची तरतुद न ठेवण्याचे कारण असे आहे की, या अधिनियमान्वये मामलदरदारचे न्यायालय हे महसूल न्यायालय न समजता दिवाणी न्यायालय समजले जाते. महसूल अधिनियम अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून मामलतदार न्यायालय अधिनियम अंमलात आहे. तथापि, कलम २३ अन्वये जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण ठेवले आहे.

➲ जिल्हाधिकारी जेव्हा त्यांना प्रदान केलेल्या न्यायिक अधिकारांचा (judicial powers) वापर करतात तेव्हा ते उच्च न्यायालयाच्या देखरेखीच्या (superintendence) आधीन असतात. या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांनी मामलतदारच्या निर्णयाच्या पुनरीक्षणामध्ये (revision) मध्ये दिलेल्या निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयात दाद मागता येते.

➲ या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचे पुनर्विलोकन (review) करण्याचे अधिकार उच्च न्यायालयास आहेत. *[संजय वि.शंकेरप्पा- महा.लॉ.जर्न. ४७८ (१९७१)]*

| ☞ **कलम २४:** | **रद्द करण्यात आले आहे** |
|---|---|

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

## ☞ **कलम २५:** **लबाडीने खोटा दावा करणे शिक्षेस पात्र**

कोणत्याही वादीस, या अधिनियमान्वयेचे कोणतेही दावापत्र, कोणत्याही महत्वाच्या बाबतीत खोटे आहे असे ज्ञान असून किंवा खात्री असून तसे असतांनाही तो दावा पत्रावर स्वाक्षरी करेल, सत्यापन करेल तर त्याने भा.द.वि. कलम १९३ अन्वये अपराध केला आहे असे समजण्यात येईल. अशा प्रकरणी मामलतदारने चौकशीअंती भा.द.वि. कलम १९३ अन्वये गुन्हा दाखल करावा.

➲ या अधिनियमाच्या या कलमान्वये अपराध सिध्दीसाठी वादीने स्वाक्षरी केली होती आणि त्याला दाव्यातील खोटेपणाचे ज्ञान होते याची पुराव्यासह खात्री होणे आवश्यक आहे. फक्त संशयावरून आणि पुरेशी चौकशी न करता असा आरोप करता येणार नाही.

➲ 'ज्ञान' (knowledge) हा अत्यंत सामर्थ्यवान (strong) शब्द आहे आणि या शब्दातून निश्चितता (certainty) प्रतित होते संभाव्यता (probability) नाही. 'विश्वास' (believe) हा शब्द, संशय (suspect) या शब्दापेक्षा प्रभावी शब्द आहे.

➲ पुरावा (evidence) यात, चौकशी दरम्यान, न्यायालयाने मान्य केलेले किंवा न्यायालयासमोर करणे आवश्यक आहे असे साक्षीदाराने केलेले विधान (statement) म्हणजे मौखिक/तोंडी पुरावा (oral evidence) आणि न्यायालयाच्या अवलोकनार्थ सादर केलेले सर्व दस्तावैज/कागदपत्रे म्हणजे लिखित पुरावा (documentary evidence) यांचा समावेश होतो.

➲ भा.द.वि. कलम १९३, १९४, १९५ अन्वये दाखल गुन्हे जर न्यायालयीन प्रकरणांच्या संदर्भात, संबंधित न्यायालयामार्फत दाखल करण्यात आले तर कोणतेही न्यायालय त्या विरूध्द आलेल्या अर्जाची दखल घेणार नाही.

## ☞ **कलम २६:** **दावा करण्यास प्रतिबंध**

**(अ)** शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, त्याच्या पदाच्या नात्याने जे कोणतेही कृत्य केले असेल किंवा असे कृत्य केल्याचे अभिप्रेत असेल त्या कृत्याबद्दल शासनाविरूध्द किंवा शासनाच्या अशा कोणत्याही अधिकाऱ्याविरूध्द , त्याने ते कृत्य त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये योग्यरित्या नेमलेलेल्या व्यवस्थापकाच्या किंवा पालकाच्या नात्याने केले असल्यास ते खेरीज करून किंवा

**(ब)** कोणताही अडथळा काढून टाकल्याच्या किंवा कोणताही कब्जा काढून घेतल्याच्या किंवा कोणत्याही कब्जास हरकत आणल्याच्याबाबतीत या अधिनियमान्वये किंवा दिवाणी न्यायालयाच्या किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, प्रकरण १२ अन्वये, पूर्वीच्या कामकाजात वादी किंवा हितसंबंधी किंवा पूर्वाधिकारी पक्षकार होता, त्याला दावा लावता येणार नाही.

➲ शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, त्याच्या पदाच्या नात्याने जे कोणतेही कृत्य केले असेल त्यासाठी त्याला दोषी ठरवून त्याच्याविरूध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

➲ शासनाच्या अधिकाऱ्याने केलेले कृत्य, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा नियमाच्या किंवा विनीयमनाच्या तरतुदींनुसार, सद्सद्विवेकबुद्धीने केलेले असावे.

तथापि, जर कोणताही अधिकारी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये व्यवस्थापक किंवा पालक म्हणून नेमला गेला असेल तर त्याच्या कृत्याविरूध्द मामलतदारच्या न्यायालयात दावा दाखल केला जाऊ शकेल. उदा.भारतीय वारसा कायद्यान्वये किंवा वेड्या माणसाची (lunatic) किंवा अज्ञान व्यक्तीची मिळकत सांभाळण्यासाठी व्यवस्थापक म्हणून नेमलेल्या अधिकाऱ्याने त्यांचा ताबा काढून घेतला असेल तर त्याच्याविरूध्द मामलतदारच्या न्यायालयात दावा दाखल केला जाऊ शकेल.

*********** ****************** ***************

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**अनुसूची अ**

**कलम १४ अन्वये नोटीसीचा नमुना**

मुद्रा

दावा क्रमांक:

दिनांक:

**श्री. .................... (नाव) तहसिलदार, तालुका .........., जिल्हा ........... यांच्या न्यायालयातील कामकाज**

**************************************************

१. नाव: ................ वय: ................

धर्म: ................ जात: ................

धंदा: ................

राहणार- ........, ता. ........, जि. ......... ...... **वादी**

***विरूध्द***

१. नाव: ................ वय: ................

धर्म: ................ जात: ................

धंदा: ................

राहणार- ........, ता. ........, जि. ......... ...... **प्रतिवादी**

**मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ अन्वये कामकाज**

ज्या अर्थी, वादी श्री. नाव: ................, वय: ................, धर्म: ................, जात: ................, धंदा: ................,

राहणार- ........, ता. ........, जि. ......... याने तुमचे विरूध्द ................. (*येथे दाव्याचा सारांश लिहावा*) या कारणासाठी या न्यायालयात दावापत्र दाखल केले आहे.

त्याअर्थी तुम्हाला नोटीस देण्यात येते की, उपनिर्दिष्ट प्रकरणात तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी, तुम्ही स्वत: किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत ................... या गावी, ................................. या ठिकाणी, दिनांक ................... रोजी, ............ वाजता हजर रहावे. आणि ज्या अर्थी, उपरोक्त तारखेस सदर दावापत्र निकालात काढण्यात येणार असल्याने, उपरोक्त ठरविलेल्या वेळी आणि जागी, तुम्ही तुमचे दस्तऐवज सादर करावेत आणि साक्षीदार हजर ठेवावेत.

तुम्हाला असेही कळविण्यात येते की, उपरोक्त ठरविलेल्या वेळी आणि जागी, तुम्ही किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधीने हजर राहण्यात कसूर केल्यास, तुमच्या किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

**टीप:** तुमच्या साक्षीदारांना या न्यायालयातर्फे अधिपत्र काढून बोलविण्यात यावे अशी तुमची इच्छा असेल तर, वाजवी मुदतीत अधिपत्रे बजावण्यात यावी म्हणून तुम्ही, तशा अर्थाचा अर्ज व साक्षीदारांचे नाव, पत्ते, उपरोक्त ठरविलेल्या दिनांकापूर्वी सादर करावे.

ही नोटीस आज दिनांक ... माहे..... सन २०.. रोजी माझ्या स्वाक्षरी व मुद्रेसह देण्यात आली आहे.

सही/-

तहसिलदार, तालुका .........., जिल्हा ............

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**अनुसूची ब**

**कलम १६ अन्वये नोटीसीचा नमुना**

मुद्रा

दावा क्रमांक:

दिनांक:

**श्री. .................... (नाव) तहसिलदार, तालुका .........., जिल्हा ........... यांच्या न्यायालयातील कामकाज**

**************************************************

१. नाव: ................ वय: ................

धर्म: ................ जात: ................

धंदा: ................

राहणार- ........, ता. ........, जि. ......... ...... **वादी**

***विरूध्द***

१. नाव: ................ वय: ................

धर्म: ................ जात: ................

धंदा: ................

राहणार- ........, ता. ........, जि. ......... ...... **प्रतिवादी**

**मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ अन्वये कामकाज**

वादी/प्रतिवादी (*यथास्थिती*) ....................................................... यास,

ज्या अर्थी, वादीने या न्यायालयात दाखल केलेल्या उपनिर्दिष्ट दाव्यात दिनांक ............ रोजी या न्यायालयाने, वादी/प्रतिवादी (यथास्थिती) ............................................ यांच्या गैरहजेरीत ........................................... (*येथे निकालाचा सारांश नमूद करावा*) असा निकाल दिला होता.

उक्त वादी/प्रतिवादी (*यथास्थिती*) ने या न्यायालयात दिनांक ...................... रोजी अर्ज करून, ते ........................................... (*येथे कारण नमूद करावे*) या कारणामुळे सुनावणीस उपस्थित राहू शकले नव्हते त्यामुळे उक्त प्रकरणाची पुन्हा सुनावणी करण्याची विनंती केली आहे.

उपनिर्दिष्ट अर्जावर .................................. या ठिकाणी, दिनांक ................... रोजी, ........... वाजता सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल.

त्याअर्थी तुम्हाला नोटीस देण्यात येते की, याबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी, तुम्ही स्वत: किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत ................... या गावी, .................................. या ठिकाणी, दिनांक ................... रोजी, ............ वाजता हजर रहावे.

तुम्हाला असेही कळविण्यात येते की, उपरोक्त ठरविलेल्या वेळी आणि जागी, तुम्ही किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधीने हजर राहण्यात कसूर केल्यास, तुमच्या किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

ही नोटीस आज दिनांक ... माहे..... सन २०.. रोजी माझ्या स्वाक्षरी व मुद्रेसह देण्यात आली आहे.

सही/-

तहसिलदार, तालुका .........., जिल्हा ...........

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**अनुसूची बब**
**कलम २१(२) अन्वये निषेधाज्ञेचा नमुना**
मुद्रा

दावा क्रमांक:
दिनांक:

**श्री. ..................... (नाव) तहसिलदार, तालुका ..........., जिल्हा ........... यांच्या न्यायालयातील कामकाज**
**************************************************

१. नाव: ................
वय: ................
धर्म: ................
जात: ................
धंदा: ................
राहणार- ........, ता. ........, जि. ......... ...... **वादी**

***विरूध्द***

१. नाव: ................
वय: ................
धर्म: ................
जात: ................
धंदा: ................
राहणार- ........, ता. ........, जि. ......... ...... **प्रतिवादी**

**<u>मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६, कलम २१(२) अन्वये निषेधाज्ञा</u>**

**दावा जमिनीचा तपशील:**

मौजे ........, ता. ......., जिल्हा .........

| अ.क्र. | सऱ्व्हे/गट नं. | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|

प्रतिवादी ....................................................... यास,
ज्या अर्थी, उपनिर्दिष्ट दाव्यात, न्यायालयास आज दिनांक ............ रोजी असे आढळून आले आहे की, वादीच्या उपरोक्त नमूद केलेल्या मिळकतीत तुम्ही
...........................................................................................................................
(*येथे अडथळयाचे स्वरूप थोडक्यात नमूद करावे*)
वरील प्रकारे अडथळा निर्माण केला आहे *किंवा* करण्याचा प्रयत्न करीत आहात असे सिध्द झाले आहे.
त्याअर्थी, तुम्हास सक्षम दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज तुम्ही वादीच्या मिळकतीत
........................................ (*येथे अडथळयाचे स्वरूप थोडक्यात नमूद करावे*)
वरील प्रकारे अडथळा निर्माण करण्यास *किंवा* अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सही/-
तहसिलदार, तालुका ..........., जिल्हा ...........


Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**अनुसूची क**

**कलम २१(२) अन्वये निषेधाज्ञेचा नमुना**

मुद्रा

दावा क्रमांक:
दिनांक:

**श्री. ………………… (नाव) तहसिलदार, तालुका ………., जिल्हा ……….. यांच्या न्यायालयातील कामकाज**

******************************************************

१. नाव: …………….
वय: …………….
धर्म: …………….
जात: …………….
धंदा: …………….
राहणार- …….., ता. …….., जि. ……… …… **वादी**

***विरूध्द***

१. नाव: …………….
वय: …………….
धर्म: …………….
जात: …………….
धंदा: …………….
राहणार- …….., ता. …….., जि. ……… …… **प्रतिवादी**

**<u>मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६, कलम २१(२) अन्वये निषेधाज्ञा</u>**

**दावा जमिनीचा तपशील:**

मौजे …….., ता. ……., जिल्हा ……….

| अ.क्र. | सर्व्हे/गट नं. | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
| --- | --- | --- | --- |

प्रतिवादी ……………………………………………… यास,
ज्या अर्थी, उपनिर्दिष्ट दाव्यात, न्यायालयास आज दिनांक ………… रोजी असे आढळून आले आहे की, वादीच्या उपरोक्त नमूद केलेल्या मिळकतीत तुम्ही
…………………………………………………………………………………………………………………
(*येथे अडथळयाचे स्वरूप थोडक्यात नमूद करावे*)
वरील प्रकारे अडथळा निर्माण केला आहे *किंवा* करण्याचा प्रयत्न करीत आहात असे सिध्द झाले आहे.
त्याअर्थी, तुम्हास सक्षम दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज, उपरोक्त मालमत्ता वादी कब्जात असणे आवश्यक आहे. सदर मिळकतीत ………………………………… तुम्ही (*येथे अडथळयाचे स्वरूप थोडक्यात नमूद करावे*) करून हरकत किंवा व्यत्यय आणण्याचा पुन्हा प्रयत्न करण्यास तुम्हाला मनाई करण्यात येत आहे.

सही/-
तहसिलदार, तालुका ………., जिल्हा ………..

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**निषेधाज्ञेची अवज्ञा केल्यास फिर्याद दाखल करणेचा नमुना:**

**तहसिलदार, तालुका ..........., जिल्हा ........ यांचे न्यायालय**

क्रमांक:
दिनांक:

प्रति,
पोलीस निरीक्षक,
......... पोलीस, ठाणे.
तालुका ..........., जिल्हा ............

या न्यायालयामध्ये वादी श्री. ...........................राहणार...................... विरूध्द प्रतिवादी श्री. ........................... राहणार ...................... असा दावा क्रमांक ............................ ची मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६, अन्वये सुनावणी होऊन त्यात, प्रतिवादी श्री. .......................... राहणार ...................... यांना वादीच्या मौजे ........, ता. ......., जिल्हा ..........

सर्व्हे/गट नं. एकूण क्षेत्र (हे. आर.) या मिळकतीत .......................................
(*येथे अडथळयाचे स्वरूप थोडक्यात नमूद करावे*) अशा प्रकारे अडथळा निर्माण करण्यास *किंवा* अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यास, मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६, कलम २१(२) अन्वये दिनांक ............. रोजी मनाई करण्यात आली आहे.
परंतु, प्रतिवादीने अद्यापही वरील प्रकारे अडथळा निर्माण करणे चालूच ठेवल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी प्रतिवादीने अद्यापही वरील प्रकारे अडथळा निर्माण करणे चालू ठेवले आहे त्याअर्थी प्रतिवादीने मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६, कलम २१(२) अन्वये दिलेल्या निषेधाज्ञेचा अवमान केला आहे.
लोकसेवकाने कायदेशीररित्या दिलेल्या आदेशाची अवज्ञा करणे हा भारतीय दंड विधान, कलम १८८ अन्वये दखलपात्र (Cognizable), जामीनपात्र (Bailable), आपसात न मिटवण्याजोगा (Non Compoundable) अपराध आहे.

त्यामुळे प्रतिवादी श्री. ........................... राहणार ...................... यांच्याविरूध्द भारतीय दंड विधान, कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील उचित कारवाई करण्यात यावी.

*मुद्रा* सही/-

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,
तालुका ..........., जिल्हा ........

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector